cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८६ | शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### दोन वाटांवरील राष्ट्रवादी; निर्णयाची हीच वेळ

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेली पोकळी ही केवळ एका नेत्याची उणीव नाही, तर ती संपूर्ण पक्षाच्या भवितव्याला प्रश्नचिन्ह लावणारी ठरली आहे.

# देशात दोन वर्षांत ८,७१० प्राथमिक कृषी सहकारी सोसायट्या

## उद्दिष्टाच्या २७ टक्के पूर्तता

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**देशभरात २०२४–२५ आणि २०२५–२६ या आर्थिक वर्षांत आतापर्यंत ८,७१० प्राथमिक कृषी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या असून, हे प्रमाण निर्धारित ३२,७५२ या उद्दिष्टाच्या सुमारे २७ टक्के आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरात दिली.**



सरकारने दोन वर्षांच्या कालावधीत देशभरात ३२,७५२ नवीन कृषी सहकारी सोसायट्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार आतापर्यंत ८,७१० सोसायट्यांची स्थापना झाली असून, उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल सुरू असल्याचे शहा यांनी स्पष्ट केले. राज्यनिहाय आकडेवारीनुसार, या कालावधीत सर्वाधिक १,५४३ सोसायट्या ओडिशामध्ये स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यापाठोपाठ राजस्थानमध्ये १,३८७, उत्तर प्रदेशात १,०९९, मध्य प्रदेशात ६२१ आणि उत्तराखंडमध्ये ६२१ सोसायट्या सुरू करण्यात आल्या आहेत. गुजरातमध्ये सुमारे ५२५, आसाम आणि छत्तीसगडमध्ये प्रत्येकी ४६९, महाराष्ट्रात १४९ तर हिमाचल प्रदेशात ११६ सोसायट्यांची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाने नव्या मॉडेल उपनियमांद्वारे या सोसायट्यांना २५ हून अधिक विविध व्यवसायिक उपक्रम राबविण्याची मुभा दिली आहे. त्यामुळे केवळ अल्पकालीन कर्जपुरवठ्यापुरत्या मर्यादित राहिलेल्या सोसायट्या आता बहुउद्देशीय आर्थिक केंद्रे म्हणून विकसित होत असल्याचे शहा यांनी नमूद केले. अल्पकालीन कर्ज व कृषी निविष्ठा पुरवठ्याबरोबरच अनेक सोसायट्या पंतप्रधान किसान समृद्धी केंद्रे म्हणून दर्जेदार खते व कीडनाशकांचे वितरण करत आहेत. तसेच 'भारत बीज' ब्रँडअंतर्गत भारतीय बीज सहकारी समिती लिमिटेड मार्फत बियाणे उत्पादन व वितरणात सहभाग घेत आहेत. शेती यंत्रसामग्रीसाठी कस्टम हायरिंग सेंटर, दुग्धव्यवसाय आणि मत्स्योद्योग क्षेत्रांनाही या सोसायट्यांकडून पाठबळ दिले जात आहे. डिजिटल सेवांच्या क्षेत्रातही पुढे येत असून, देशभरातील ५१ हजारांहून अधिक प्राथमिक कृषी सहकारी सोसायट्या ▶▶ पान २ वर

# मुसलमानांच्या मानेवर सुरी

## केंद्र सरकारच्या नव्या नियमावलीवरून एमआयएम आक्रमक

दिल्ली । वृतसंस्था

**केंद्रीय गृह मंत्रालयाने 'वंदे मातरम्' संदर्भात जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांवरून राजकीय वातावरण तापले आहे. एआयएमआयए दिल्लीचे अध्यक्ष शोएब जमई यांनी या निर्णयाचा तीव्र निषेध केला असून केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. दबाव टाकून किंवा मुसलमानांच्या मानेवर सुरी ठेवून तुम्ही त्यांच्याकडून 'वंदे मातरम्' म्हणवून घेऊ शकत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.**




पीटीआयशी बोलताना शोएब जमई यांनी केंद्र सरकारचा हा निर्णय म्हणजे हुकूमशाही आणि दमनकारी वृत्ती असल्याचे म्हटले. ते म्हणाले की, संविधानात कुठेही 'वंदे मातरम्' म्हणणे घटनात्मकरीत्या अनिवार्य असल्याचे लिहिलेले नाही. हे गाणे संविधानाचा भाग नाही आणि त्याला राष्ट्रगीताचा दर्जाही मिळालेला नाही. राष्ट्रगीताचा (जन गण मन) आम्ही सर्वजण मनापासून आदर करतो ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये ५२ कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर निलंबनाची कारवाई

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्री केंद्रांच्या तपासणीत आढळून आलेल्या विविध त्रुटींमुळे ५२ कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तसेच बोगस खत विक्री करणाऱ्या दोन कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर व संबंधित कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे कृषी विभागाने कळविले आहे.**



जिल्ह्यात युरिया खताची जादा दराने व लिंकिंग करून विक्री झाल्यास तक्रार करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. खत विक्रेत्यांकडून युरियाची साठेबाजी, जादा दराने विक्री, लिंकिंग तसेच बोगस खत विक्री केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना पावती घेणे बंधनकारक असून, कोणतीही अनियमितता आढळल्यास तत्काळ तक्रार नोंदवावी. शेतकऱ्यांच्या सोईसाठी त्यांनी आपल्या मोबाइलमध्ये 'कृषक ॲप' डाउनलोड करावे, असेही कृषी विभागामार्फत आवाहन करण्यात आले आहे. या ॲपच्या ▶▶ पान २ वर

# ५ हजार सहा–प्राध्यापक पद भरतीस मान्यता

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.


मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ▶▶ पान २ वर

# मनभेद विसरून सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी उभे राहूया

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत धनंजय मुंडेंची भावनिक साद

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्याच्या विकासाचे वर्षानुवर्षे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आता सर्वांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली वहिनींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी योगदान देऊ, अशी भावनिक साद माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत घातली.**



उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक पार पडली. स्वर्गीय अजित पवार यांच्या निधनानंतर जिल्हा नियोजन समितीची ही पहिलीच बैठक असल्याने वातावरण भावनिक होते. यावेळी धनंजय मुंडे यांनी स्व.अजित ▶▶ पान २ वर

# कामगारांच्या संपाने व्यवहार विस्कळीत

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणांविरोधात ३० कोटी कामगारांनी देशव्यापी संप पुकारला. वीज, बँकिंग, विमा आणि वाहतूक यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले. नवीन श्रम कायदे, वीज खासगीकरण आणि मनरेगाच्या मुद्यांवरून कामगार संघटनांनी सरकारला आव्हान दिले.

केंद्रीय ट्रेड युनियन्सच्या संयुक्त प्लॅटफॉर्मने आपल्या मागण्यांसाठी गुरूवार दि. १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप केला. ट्रेड युनियन्सचे म्हणणे आहे की हा संप केंद्र सरकारच्या कामगार–विरोधी, शेतकरी–विरोधी आणि देश–विरोधी, कॉर्पोरेट समर्थक धोरणांच्या विरोधात आहे. या आंदोलनात बँकिंग, ▶▶ पान २ वर

# ४ लाख ऊसतोड कामगारांना मिळणार शिधासंच

## सामाजिक न्याय मंत्री असताना मुंडेंनी केली होती योजना प्रस्तावित

मुंबई । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांना १५९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी गुरूवारी ऊसतोड कामगारांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य शासनाने



राज्यातील ४ लाख ऊसतोड कामगारांना सण – उत्सव उत्साहात साजरे करण्यात यावेत, यासाठी खास मोफत शिधासंच वाटप करण्याचा निर्णय घेतला असून या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात या योजनेतून ४ लाख नोंदणीकृत ऊसतोड कामगारांपैकी १ लाख ▶▶ पान २ वर

# राज्यात गटसचिवांचे कामबंद आंदोलन

## वेतन प्रश्नावरून आक्रमक, शेती कामांत अडथळा

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील गटसचिवाच्या सेवा आणि वेतन विषयक अडचणीची सोडवणूक होत नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी गट सचिव संघटना कृती समितीच्या वतीने असहकार व कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे राज्यातील संभाव्य कृषी कर्जमाफी माहितीस विलंब व संगणकीय कामकाजावर बहिष्कार टाकल्याने मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. या संदर्भातील निवेदन सहकारमंत्र्याना देण्यात आले, सद्यस्थितीत राज्यात २१ हजार विकास सोसायट्या कार्यरत असुन त्यासाठी ▶▶ पान २ वर





# इन्स्टाग्राम–यूट्यूबविरोधात ऐतिहासिक खटला सुरू

## किशोरवयीन मुलांना सोशल मीडियाचे व्यसन

नवी दिल्ली । वृतसंस्था

**सोशल मीडिया हे केवळ संवादाचे माध्यम राहिलेले नाही; तर ते आज किशोरवयीन मुलांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. मात्र, या डिजिटल सवयींची किंमत मानसिक आरोग्याच्या रूपाने मोजावी लागते का, हा प्रश्न आता थेट न्यायालयात पोहोचला आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया न्यायालयात सुरू झालेला इन्स्टाग्राम आणि यूट्यूबविरोधातील खटला केवळ एका तरुणीचा वैयक्तिक संघर्ष नाही, तर संपूर्ण सोशल मीडिया उद्योगाच्या नैतिक जबाबदारीवर प्रकाश टाकणारा आणि त्याचवेळेस त्या संदर्भात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करणारा ठरला आहे.**



### खटल्याचा केंद्रबिंदू काय?

या प्रकरणातील फिर्यादी ही २० वर्षीय तरुणी असून तिने न्यायालयीन गोपनीयतेसाठी स्वत:ची ओळख 'केजीएम' अशी ठेवली आहे. तिने सहाव्या वर्षी यूट्यूब वापरण्यास सुरुवात केली आणि नवव्या वर्षी इन्स्टाग्रामवर अकाउंट उघडले. त्यानंतर हळूहळू या प्लॅटफॉर्म्सनी तिचे आयुष्यच नियंत्रण करण्यास सुरुवात केली असा तिचा आणि तिच्या आईचा दावा आहे.

जगभरातील सोशल मीडियाच्या किशोरवयीन मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत गंभीर चर्चा सुरू असतानाच या खटल्याच्या सुनावणीस सुरुवात होत आहे, हे विशेष. चिंता, नैराश्य आणि शरिराविषयी न्यूनगंड, त्याचबरोबर दुसरीकडे मनात आत्महत्येचे विचार आदी सर्व बाबींशी सोशल मीडियाच्या वापराचा अतिशय निकटचा ▶▶ पान २ वर

# कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची शेती उद्ध्वस्त

## सुमारे ७२.८४ लाखांचा मुद्देमाल जप्त

धाराशिव । प्रतिनिधी



वाशी पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव यांच्या संयुक्त पथकाने मौजे दसमेगाव शिवार (ता. वाशी) येथे मोठी कारवाई करत कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची बेकायदेशीर शेती उद्ध्वस्त केली. या कारवाईत तब्बल ४८५.६५ किलो अफूची झाडे व बोंडे जप्त करण्यात आली असून, त्यांची अंदाजे बाजार किंमत ७२ लाख ८४ हजार ७५० रुपये इतकी आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समाधान मनोहर उघडे (रा. दसमेगाव) यांच्या मालकीच्या गट क्रमांक १६३ मधील शेतात

## थोडक्यात...

### राजपाल यादवचा तिहार मुक्काम वाढला

नवी दिल्ली :अभिनेता राजपाल यादवला दिल्ली उच्च न्यायालयाने गुरूवारी (दि.१२) मोठा झटका दिला. आर्थिक व्यवहाराबाबत दिलेले आश्वासन पाळण्यात अपयशी ठरल्याबद्दल न्यायालयाने जामीन अर्जावरील सुनावणी सोमवारपर्यंत (१६ फेब्रुवारी) पुढे ढकलल्यामुळे राजपाल यादवला किमान आणखी चार रात्री तिहार कारागृहातच काढाव्या लागणार आहेत. राजपाल यादवने २०१० मध्ये अता पता लापता या आपल्या चित्रपटासाठी मुरली प्रोजेक्ट्स कंपनीकडून ५ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. व्याजासह ही रक्कम आता साधारण ९ कोटी रुपयांच्या घरात गेली आहे. गेल्या १५ वर्षांपासून ही रक्कम न परत केल्याचा आरोप राजपाल यादववर आहे. याप्रकरणी न्यायालयाने त्याला सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा सुनावली असून, ५ फेब्रुवारीपासून तो न्यायालयीन कोठडीत आहे.

### इम्रान खान यांची ८५ टक्के दृष्टी गेली

इस्लामाबादः माजी पंतप्रधान आणि पीटीआय पक्षाचे संस्थापक इम्रान खान यांच्या प्रकृतीबाबत समोर आलेल्या एका धक्कादायक वृत्ताने पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. दीर्घकाळापासून रावळपिंडीतील अदियाला तुरुंगात बंदिस्त असलेल्या इम्रान खान यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी ८५ टक्क्यांपर्यंत निकामी झाली आहे, असा दावा त्यांच्या पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने खान यांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी एक विशेष वैद्यकीय पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात इम्रान खान यांच्या तुरुंगातील स्थितीबाबत सुनावणी पार पडली.

### मंत्रालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांची होणार बदली

मुंबईः मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव व्ही राधा यांनी सर्व विभागाच्या आस्थापना आणि सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेस निर्देश देत सर्व विभागातील सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी आणि सहायक कक्ष अधिकारी, कक्ष अधिकारी, लिपिक–टंकलेखक व लघुलेखक यांच्या बदल्या एप्रिल–मे २०२६ करण्यात येणार आहे. मात्र या बदल्यांची कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश एका पत्रान्वये जारी करण्यात आले आहे. या पत्रात अप्पर मुख्य सचिव व्ही राधा म्हणाल्या की, मागील अनेक वर्षापासून अधिकारी–कर्मचाऱ्यांची बदली केल्यानंतर त्यांच्या बदलीस मुदत वाढ देण्याची मागणी–बदली रद्द करण्याची मागणी संबधित प्रशासकीय विभाग करतात.

### पार्थ पवार यांचा राज्यसभा प्रवेश निश्चित?

मुंबईः महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला असून पार्थ पवार यांचा राज्यसभा प्रवेश आता निश्चित मानला जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली, त्यांच्यात सुमारे ४० मिनिटे महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीत मोंदीनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांच्याशी झालेल्या भेटीत पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्यास भाजपने हिरवा कंदील दाखवला असल्याच्या चर्चा सुरु झाल्या. सुनेत्रा पवार यांच्या जागी पार्थ पवार राज्यसभेची जागा भूषवतील. दरम्यान, राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून पुढील एका महिन्यात सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती होण्याची दाट शक्यता आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१२ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २९.५० क्विंटल | २,२०० | ३,००० | २,६३७ |
| ज्वारी/हायब्रिड :१८.०० क्विंटल | २,६२० | ४,३०० | ३,३४४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १४.५० क्विंटल | ५,४०० | ७,६९१ | ७,२५६ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: ७.५० क्विंटल | १,८०० | ३,९६० | २,७१८ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,०८० | ५,२०० | ५,१४० |

cmyk

अग्रलेख

# दोन वाटांवरील राष्ट्रवादी ; निर्णयाची हीच वेळ

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेली पोकळी ही केवळ एका नेत्याची उणीव नाही, तर ती संपूर्ण पक्षाच्या भवितव्याला प्रश्नचिन्ह लावणारी ठरली आहे. एका बाजूला शरद पवार यांचे अनुभवी, परंतु वयोमानाने मर्यादित होत चाललेले नेतृत्व आणि दुसऱ्या बाजूला अजितदादांच्या जाण्यानंतर दिशाहीन झालेला पार्श्वभूमीवर दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची चर्चा केवळ राजकीय अफवा नसून अपरिहार्यता बनत चालली आहे.

अजित पवार हे उपमुख्यमंत्रीपदावर राहून राष्ट्रवादीचा संघटनात्मक गाडा ओढणारे आणि कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय असलेले नेतृत्व होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्तेत असूनही अपेक्षित यश न मिळणे, पुण्यासारख्या बालेकिल्ल्यातील सत्ता गमावणे आणि त्यानंतर त्यांचे निधन या घटनांनी पक्षाला मोठा धक्का बसला. त्यांच्या पश्चात सहानुभूतीच्या लाटेवर सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले. मात्र भावनिक निर्णय आणि राजकीय स्थैर्य या दोन भिन्न गोष्टी आहेत. शपथग्रहणानंतर काही दिवसांनी मंत्रालयीन कारभार स्वीकारणे आणि मंत्रिमंडळ बैठकीत सहभाग घेणे हे स्थैर्याचे संकेत असले, तरी संघटनात्मक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. राष्ट्रवादीचे दोन गटदोन्ही पवार कुटुंबाशी निगडितआज वेगवेगळ्या राजकीय प्रवाहात आहेत. शरद पवार गट काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत आहे; तर अजित पवार गट सत्ताधारी भाजपसोबत. अशा परिस्थितीत एकाच पक्षाचे दोन राजकीय तट एकमेकांच्या विरोधी दिशेने चालणे किती काळ शक्य आहे? दोन होड्यांवर पाय ठेवून राजकारण करणे कोणालाही परवडत नाही; राष्ट्रवादीलाही नाही. दिल्लीतील हालचाली या पेचप्रसंगाचे गांभीर्य अधोरेखित करतात. अजित पवार गटाच्या नेत्यांनी भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाची भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विलीनीकरणाबाबत स्पष्ट भूमिका घेत खुलासा अपेक्षित असल्याचे म्हटले. म्हणजेच हा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो राष्ट्रीय राजकारणाच्या समीकरणांशी जोडला गेला आहे. जर दोन्ही गटांचे विलीनीकरण झाले आणि राष्ट्रवादीने भाजपासोबत स्पष्टपणे जाण्याचा निर्णय घेतला, तर त्याचे दूरगामी परिणाम होतील. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठा फटका बसेल. काँग्रेसलाही राष्ट्रीय पातळीवर धक्का बसू शकतो. केंद्रातील सत्तेसाठी हे समीकरण फायदेशीर ठरू शकते. परंतु प्रश्न केवळ सत्तेचा नाही; तो विचारसरणीचा आणि कार्यकर्त्यांच्या भावनांचा आहे. शरद पवार यांचे राजकारण हे स्वायत्त आणि प्रादेशिक अस्मितेवर आधारलेले राहिले आहे. भाजपविरोधी भूमिकेतून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. अशा वेळी भाजपसोबत जाण्याचा निर्णय हा तत्त्वनिष्ठतेवर प्रश्न उपस्थित करणारा ठरू शकतो. दुसरीकडे, सत्तेबाहेर राहून संघटना टिकवणेही आजच्या राजकारणात कठीण झाले आहे. त्यामुळे 'सत्ता की स्वायत्तता' हा खरा प्रश्न राष्ट्रवादीसमोर उभा आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या चलबिचलीतून पक्षाने धडा घ्यायला हवा. नेतृत्वाच्या पोकळीवर तात्पुरते मलमपट्टी करून चालणार नाही. संघटनात्मक पुनर्रचना, स्पष्ट राजकीय दिशा आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. विलीनीकरण हा उपाय असू शकतो; पण तो तत्त्वांवर आधारित आणि स्पष्ट भूमिकेसह झाला पाहिजे. अन्यथा तो केवळ सत्तासमीकरणांचा भाग ठरेल. महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थान महत्त्वाचे आहे. या पक्षाने अनेकदा सत्तेची किल्ली आपल्या हातात ठेवली आहे. आजही तोच क्षण आहेनिर्णयाचा, दिशेचा आणि धैर्याचा. दोन गटांचे विलीनीकरण होणार की नाही, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. परंतु एक गोष्ट नक्कीराष्ट्रवादीला आता संभ्रम परवडणारा नाही. स्पष्ट भूमिका घेऊन एकाच मार्गाने पुढे जाणे हाच त्याच्या अस्तित्वाचा आणि प्रभावाचा खरा पाया ठरेल.

# नेकनूर पोलिसांनी पकडला दोन लाखाचा गांजा

## पोलिस निरीक्षक गोसावी यांची कामगीरी

**नेकनूर । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाई दरम्यान नेकनूर पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत गांज्याच्या तस्करीचा प्रकार उघडकीस आणला. सिमेंटच्या गोणीतून गांज्याची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी रात्री बारा वाजताच्या सुमारास कारवाई करत सुमारे पावणे तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना रंगेहात ताब्यात घेतले आहे. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणीङ्गबुद्रुक येथील एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांजा साठवून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रात्री १२ वाजता छापा टाकला.**

कारवाईदरम्यान दोन सिमेंटच्या गोण्यांमध्ये एकूण ११ किलो १५० ग्रॅम गांजा आढळून आला. जप्त केलेल्या गांज्याची किंमत सुमारे २ लाख ७८ हजार ७५० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईत गुमाणसिंग शिवराम पावरा (वय ३५, रा. बोरमल्ली पाडा, ता. शिरपूर, जि. धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय १९, रा. बाखरली, ता. वरला, जि. बडवानी, मध्यप्रदेश) या दोघांना तस्करीच्या प्रयत्नात असताना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या विरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर करीत आहेत. या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांवर पोलिसांची कडक नजर असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले असून पुढील काळातही अशा कारवाया सुरूच राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. नेकनूर परिसरात अंमली पदार्थांची तस्करी किंवा अवैध धंदे चालू देणार नाहीत. मिळालेल्या माहितीच्या आधारे मध्यरात्री ही कारवाई करण्यात आली असून पुढील काळातही अशा बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील. नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे. चंद्रकांत गोसावी पोलीस निरीक्षक,नेकनूर

# उपविभागीय अभियंता चिरकेंनी सार्वजनिक बांधकाम विभागाची वाट लावली

**गेवराई । प्रतिनिधी**

**उपविभागीय अभियंता चिरकेंनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत सुरू असलेल्या विविध रस्त्याच्या कामात कंत्राटदार धार्जिणे धोरण ठेवून, काम सुरू ठेवले आहे. त्यामुळे, गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्याची काही कामे अर्धवट राहीली आहेत तर काही कामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत. चकलांबा, माटेगाव, पांडरवाडी फाटा ते गेवराई जातेगाव फाटा ते जातेगाव राज्य रस्त्याची अनेक कामे कंत्राटदारांनी मेरी मर्जी, या दृष्टिकोनातून पूर्ण करण्याचा सपाटा लावला आहे.**



दरम्यान, गेवराई उपविभागीय अभियंता चिरकेंनी सार्वजनिक बांधकाम विभागाची वाट लावली आहे. वर्षा अखेरीस येणाऱ्या देखभाल दुरूस्तीची लाखो रुपये मर्जीतल्या कंत्राटदाराच्या नावावर उचलले आहेत. गेवराई-उमापूर राज्य रस्त्यावर धोंडराई पुलाचे कठडे पडून, वर्ष होत आले. त्याकडे, चिरकेंना चिरकायला वेळ नाही. उपविभागीय अभियंता आणि शाखा अभियंता यांच्या टोळीने सार्वजनिक बांधकाम म्हणजे आपली खाजगी मालमत्ता असल्याचे समजून खोटे - नाटे उद्योग केले आहेत. गेवराई-मालेगाव,चकलांबा फाटा ते चकलांबा, वडगाव ढोक ते वडगाव रस्ता अत्यंत खराब झाला आहे. मालेगाव ता. गेवराई रस्त्यावरून जाणे कठीण झाले असताना, ज्या कंत्राटदाराने सदरील काम अर्धवट करून सोडून दिले,त्या संदर्भात एक ही अधिकारी जाब विचारत नाही. या रस्त्यावरून धड चालता येत नाही. अशी सद्यस्थिती असताना सुद्धा कंत्राटदाराची बिले काढण्यात आली आहेत. डांबरीकरण न करताच, केवळ खड्डीकरण करून गुत्तेदाराने अर्धवट रस्ता केला आहे. गेवराई-उमापूर रस्त्यावर जागोजाग खड्डे पडलेत. त्याकडे दुर्लक्ष करून, उपविभागीय अभियंता केवळ मलिदा लाटण्यात गुंग आहे का ? असा प्रश्न पडतो. दरम्यान, गेवराई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहाचे नूतनीकरणाचे काम गुत्तेदार स्वतः बांधकाम विभागाचा इंजिनिअर असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. कोणत्याही प्रकारची निविदा न काढता, कामाची मंजुरी न घेताच काम सुरू आहे. वरिष्ठांना मॅनेज करून दरवर्षी, थातूरमातूर काम करून, लाखोची बिले काढली जात असल्याने, या विभागाला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे.

# जि.प.निवडणू सतीश घाटगे अॅक्शन मोडमध्ये ;शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

घनसावंगी । प्रतिनिधी

राज्यात जिल्हा परिषद निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडला येत्या काही दिवसात दुसऱ्या टप्प्यातील जिल्हा परिषद निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर घनसावंगी विधानसभेत भाजपा नेते सतीश घाटगे सक्रीय झाले आहे. निवडणुकीच्या तोंडावर गुरुवारी राजाटाकळी, शिवणगाव येथील शिवसेना व राष्ट्रवादीच्या असंख्य कार्यकर्त्यांनी सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

शिवनगाव येथील राष्ट्रवादीचे प्रमुख कार्यकर्ते बाळासाहेब तौर यांनी सतीश घाटगे यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. तर राजाटाकळी येथील भाजप कार्यकर्ते सुदर्शन उर्फ लखन आर्दड, अर्जुन तौर, ज्ञानेश्वर मोरे, विष्णू तौर यांच्या मार्गदर्शनाखाली राजाटाकळी येथील असंख्य कार्यकर्त्यांनीही भाजपात प्रवेश केला. या पक्ष प्रवेशावेळी 'समृद्धी'चे मुख्य



शेतकी अधिकारी अमोल तौर, भाजपा ओबीसी मोर्चाचे तालुका अध्यक्ष माधव टेहळे यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपामध्ये पक्ष प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यामध्ये सालाराम नानाभाऊ आर्दड, ज्ञानेश्वर बापूराव गोरे, निवृत्ती रामभाऊ तौर, शंकर भगवान आर्दड, राधाकिसन निवृत्ती तौर, भिमा निवृत्ती तौर, बळीराम गुलाब तौर, प्रकाश प्रल्हादराव तौर, दत्तात्रय प्रल्हाद तौर, शिवाजी भगवान तौर, सचिन लक्ष्मण तौर, लक्ष्मण नामदेव तौर, संदिप गणेश तौर, पांडुरंग दामोधर आर्दड, गणेश राजाभाऊ आर्दड, आदेश बाबुराव व्यवहारे, राधाकिसन फुलचंद कचरे, हमेद सय्यद, गौतम किसन आर्दड, श्रीकृष्ण शेषराव आर्दड, दत्ता पांडुरंग मोरे, योगेश ज्ञानबा डेंगळे, उमर अफसर पठाण, गणेश रामभाऊ आर्दड, लहू शिवाजी हिवाळे, मधुकर यादवराव व्यवहारे, विष्णू पिंपळे, सखाराम बन्सी हिवाळे, लक्ष्मण बाबासाहेब आर्दड, बाबुराव एबसाहेब आर्दड, रामनाथ नल्लेश्वर, ज्ञानेश्वर राधाकिसन आर्दड, मजहर बाबाभाई पठाण, रमेश सोपान शिंदे, गणेश बेंडू आर्दड, कृष्णा गंगाधर आर्दड, दिलीप लहानुजी हिवाळे, अनिल भिसे यांच्यासह आदींचा समावेश आहे.

# तणावाच्या काळात अनेकांचे हात-पाय पडतात थंड-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**कामाचा दबाव,कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा भविष्याबद्दलच्या चिंता यांचा केवळ मनावरच नाही तर शरीरावरही परिणाम होतो. तणावाच्या काळात अनेकांचे हायपाय अचानक थंड पडतात. त्यामागे काही वैज्ञानिक कारणे आहेत. रक्तप्रवाह कमी :- तणावाच्या वेळी शरीर स्वतःला धोक्यात असल्याचे समजते. डॉक्टर स्पष्ट करतात की तणावाच्या वेळी, शरीर मेंदू आणि हृदयासारख्या महत्वाच्या अवयवांना प्राधान्य देते. त्यामुळे हातपायांमध्ये रक्तप्रवाह कमी होऊन त्यांना थंडी जाणवते.**



रक्तवाहिन्यांचे आकुचन : तणावामुळे अॅड्रनालाइन आणि कॉर्टिसोलसारखे ताण संप्रेरक बाहेर पडतात. त्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. डॉक्टरांच्या मते, जेंव्हा रक्तवाहिन्या आंकुचन पावतात तेंव्हा हातपायांपर्यंत कमी गरम रक्त पोहोचते. त्यामुळे अचानक थंडी वाजू लागते. चिंतेमुळे होते घबराट :- अतिचिंतेमुळे घाबरल्यासारखे होऊ शकते. या काळात श्वासोच्छ्वास जलद होतो. शरीरातील ऑक्सिजन संतुलन बिघडू शकते. पॅनिक अटॅकदरम्यान, हात आणि पाय थंड, सुन्न किंवा थरथर कापू शकतात. ही मज्जासंस्थेची प्रतिक्रिया आहे, असे डॉक्टर सांगतात. १) रक्तदाब,साखरेच्या पातळीत बदल :- काही लोकांचा रक्तदाब अचानक कमी होऊ शकतो किंवा तणावाच्या वेळी त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी असंतुलित होऊ शकते. डॉक्टर म्हणतात की, कमी रक्तदाब किंवा कमी साखरेसारख्या परिस्थितीत, हातपायांपर्यंत पुरेशी ऊर्जा पोहोचत नाही, ज्यामुळे हातपाय थंड होऊ शकतात. २) थायरॉइड किंवा मज्जासंस्थेच्या समस्या :- जर हातपाय थंड नसतांनाही वारंवार थंड राहिले तर ते अंतर्निहित समस्येचे लक्षण असू शकते. डॉक्टर म्हणतात की, ताणामुळे थायरॉइड किंवा मज्जासंस्थेच्या समस्यांमध्ये लक्षणे आणखी बिकट होई शकतात. ३) डॉक्टरांशी कधी संपर्क साधावा? - जर ताणतणावासोबत सतत हातपाय जास्त थंड होणे, सुन्न होणे किंवा मुंग्या येणे, चक्कर येणे,चिंता किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका आणि स्वतःकडे लक्ष द्या असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान १ वरून...

### देशात दोन वर्षांत ८,७१० प्राथमिक

कॉमन सर्व्हिस सेंटर म्हणून कार्यरत आहेत. या माध्यमातून बँकिंग, विमा यांसह सुमारे ३०० ई-सेवा पुरविल्या जात आहेत. याशिवाय जनौषधी केंद्रे, पाईपद्वारे पाणीपुरवठा योजनांचे संचालन व देखभाल, किरकोळ इंधन विक्री केंद्रे आणि एलपीजी वितरण केंद्रे चालविण्याची परवानगीही सोसायट्यांना देण्यात आल्याचे लेखी उत्तरात स्पष्ट करण्यात आले आहे.ङ्गकेंद्र सरकारच्या या उपक्रमामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याबरोबरच सहकार क्षेत्र अधिक सक्षम आणि बहुआयामी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### बीडमध्ये ५२ कृषी निविष्ठा

माध्यमातून शेतकऱ्यांना युरिया व इतर खते कोणत्या कृषी निविष्ठा विक्री केंद्रावर उपलब्ध आहेत. याची माहिती सहजपणे मिळू शकते. त्यासोबतच जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांना सूचित करण्यात आले आहे, की अनुदानित खताची विक्री ही केवळ ई-पॉस मशिनद्वारेच करावी. ई-पॉस मशिनशिवाय खत विक्री केल्यास संबंधित विक्री केंद्रावर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कृषी विभागाचे तालुका गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांचे संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत.

--------

### मुसलमानांच्या मानेवर

आणि त्यावर कोणताही वाद नाही. मात्र, 'वंदे मातरम्'बाबत अनेक मुस्लिम विद्वान आणि उलेमांनी यापूर्वीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे, असे जमई यांनी नमूद केले. हे गीत इस्लाममधील एकेश्वरवादाच्या सिद्धांताच्या विरोधात असल्याने ते कोणावरही लादणे अयोग्य असल्याचे त्यांनी सांगितले. जमई यांनी संविधानातील अनुच्छेद १५, २१ आणि २५ चा हवाला देत म्हटले की, कोणत्याही नागरिकावर अशा प्रकारची सक्ती करणे हे धार्मिक स्वातंत्र्याचे थेट उल्लंघन आहे. भाजप आणि आरएसएसने या मुद्द्याला राजकीय प्रचाराचे साधन बनवले असून मुसलमानांविरुद्ध त्याचा शस्त्रासारखा वापर केला जात आहे. आम्ही कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

-----------

### कामगारांच्या संपाने

वीज, विमा, वाहतूक, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील सुमारे ३० कोटी कामगार सहभागी झाले. आझाद भारताच्या इतिहासातील हा सर्वात मोठा औद्योगिक संप असल्याचे मानले जात आहे. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या सरचिटणीस अमरजीत कौर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपामुळे देशातील बँकिंग आणि विमा सेवांना मोठा फटका बसला आहे. एआयबीईए आणि एआयबीओए सारख्या मोठ्या युनियन या संपात सामील झाल्या आहेत. विमा क्षेत्रातील कर्मचारी १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला विरोध करत असून, नवीन कामगार कायद्यांच्या विरोधात आपला संताप व्यक्त करत आहेत. वीज क्षेत्रातील खासगीकरण आणि विद्युत (सुधारणा) विधेयक २०२५ विरोधात देशातील २७ लाख वीज कर्मचारी आणि अभियंते या संपात उतरले. ऑल इंडिया पॉवर इंजिनिअर्स फेडरेशनचे अध्यक्ष शैलेंद्र दुबे यांनी स्पष्ट केले की, प्रस्तावित राष्ट्रीय वीज धोरण २०२६ हे सामान्य ग्राहकांच्या आणि लघुउद्योगांच्या हिताच्या विरोधात आहे. आऊटसोर्सिंग बंद करून नियमित भरती सुरू करावी आणि जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

---------

### मनभेद विसरून सुनेत्रा वहिनींच्या

पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडल्यानंतर उपस्थितांना उद्देशून भावनिक साद दिली. मुंडे पुढे म्हणाले, स्व. अजितदादा हे मला कायम वडिलकीचा आधार देणारे होते. माझे आणि त्यांचे नाते अतिशय वेगळे होते. त्यांच्या अकाली जाण्याने केवळ वैयक्तिक नाही तर जिल्ह्याचेही मोठे नुकसान झाले आहे. दादांनी अल्प काळात बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते, असे सांगत मुंडे यांनी काही योजनांचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले की, संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ११ वसतिगृहांच्या उभारणीसाठी १५९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या संदर्भात अजित पवार यांनी स्वतः मला शब्द दिला होता, अशी आठवणही धनंजय मुंडे यांनी उपस्थितांसमोर सांगितली. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या जागी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तसेच अजित पवार पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीपदही त्यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची ही पहिलीच बैठक असल्याने या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी झाल्या. सुनेत्रा पवार यांनी बीड आणि पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठका घेतल्या.

------------

### ५ हजार सहा-प्राध्यापक

पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थी संख्येवर आधारित पदे दि.१ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असेल. ज्या शैक्षणिक संस्थांकडे 'नॅक' मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी ३ वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे. दरम्यान, भरती प्रक्रियेदरम्यान राज्यात आचारसंहिता लागू असल्यास, निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संचालक,उच्च शिक्षण पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

------------

### राज्यात गटसचिवांचे

१२ हजार ५०० सचिवांची आवश्यकता असताना केवळ ४५०० गटसचिवांवर कामकाज सुरू आहे. गटसचिवांना मिळणारे वेतनमान अत्यंत कमी असून तेही वेळेवर मिळत नाही. तरीसुध्दा नियमिमतपणे कामकाज सुरु आहे. यापूर्वी आंदोलन केल्यानंतर समित्या नेमून त्यांचे अहवाल शासनास सादर करण्यात आले. परंतु आजपर्यंत त्यावर कुठलाही ठोस निर्णय झाला नाही. शिवाय १० फेबुवारी २०२६ पर्यंत शासन स्वस्तरावर बैठक होवून थकीत वेतन व इतर अडचणीबाबत तात्काळ निर्णय घेवून अंमलबजावणीबाबत पत्र देऊनही दखल घेतली नसल्यामुळे शासनाच्या संभाव्य कृषिकर्ज माफीच्या माहित्या व संगणकीय कामकाज व डायनामिक डे एंड कामकाजावर बहिष्कार व असहकार आंदोलन सुरु करत अर्थसंकल्पीय अधिवेशनावर मुंबई येथे भव्य मोर्चा व आक्रोश आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ६९ (अ) निर्गमित झालेला असुन त्यानुसार महाराष्ट्र राज्य केडर पुनर्जीवित करून त्याअंतर्गत सर्व जिल्हा केडरसाठी अनुदानित महामंडळ स्थापित करावे. ०६ सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना त्यांच्या व्यवस्थापन व आस्थापना खर्च भागविण्यासाठी मिळणाऱ्या अर्थसहाय्यतात ४ लाखापर्यंत वाढ करून त्यातील सर्व अटी व शर्ती रद्द करून सदर अर्थसहाय्यताची रक्कम वेतनासाठी अनुज्ञेय करावी. थकीत पगाराची व इतर देयकापोटी २५० कोटी शासनाने अदा करावी. समान काम समान वेतन याप्रमाणे ग्रामसेवका समान वेतनश्रेणीसह राज्यभर समान सेवा नियम लागू करण्यात यावे. तसेच आजपर्यंतचे थकीत वेतन व देयता शासनाने अदा करावी. महाराष्ट्र शासनाने शेतकरी कर्जमाफी संदर्भात केलेल्या घोषणेमुळे वसुलीवर होणाऱ्या अनिष्ट परिणामामुळे संस्थांचे उत्पन्न कमी होवून पर्यायाने वेतन बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झाल्थाने विशेष बाब म्हणून पुढील दोन वर्षासाठी येणारी वेतनाच्या तुटीची रक्कम शासनाने उपलब्ध करून द्यावी, तसेच होणाऱ्या संभाव्य कर्जमाफीतुन परतफेड करण्याच्या अटीवर बिनव्याजी स्वरुपात वेतनासाठी लागणारा आवश्यक निधी संबंधित जिल्हा केडरला उपलब्ध करून देणेबाबत संबंधित जिल्हा बँकांना आदेश निर्गमित करण्या यावा. वेतनासाठी आकारणी केलेली पगार वर्गणी भरणा करण्यास कसूर करणाऱ्या सहकारी संस्था व जिल्हा बँका विरुध्द थकीत येणे पगार वर्गणीच्या येणे असलेल्या रक्कमा संस्थेच्या येणे कर्जावरील व्याज खाती नांवे टाकून सक्तीने पगार वर्गणी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील नियम ५३ (ब-८) मध्ये तरतुद करण्यात यावी.मयत गटसचिवांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घ्यावे.सेवानिवृत्ती वय ५८ वरून ६० वर्ष करावी, अशा मागण्या संघटनेकडून करण्यात आल्या आहेत.

------------

### ४ लाख ऊसतोड कामगारांना

कामगारांना हा शिधासंच मोफत दिला जाणार असून, उर्वरित ३ लाख कामगारांना टप्प्या टप्प्याने हा शिधा दिला जाणार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात धनंजय मुंडे हे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री असताना लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला मूर्त स्वरूप प्राप्त होऊन कायमस्वरूपी निधीची तरतूद करण्यात आली होती. त्याचदरम्यान ऊसतोड कामगारांना कामाच्या ठिकाणी सण उत्सव साजरे करता यावेत, यासाठी खास आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला होता. विशेष म्हणजे त्या वेळी संबंधित विषय कॅबिनेट समोर आणण्यासाठी अवघ्या अर्ध्या तासात मान्यता दिली होती. दरम्यान या शिधासंचामध्ये २ किलो साखर, एक किलो खाद्यतेल, एक किलो चणा डाळ, एक किलो रवा, एक किलो मैदा, एक किलो पोहे अशी सुमारे ६१० रुपये किंमतीच्या खाद्य पदार्थांचा समावेश असणार आहे. पहिल्या टप्प्यात सहा कोटी दहा लाख रुपये किंमतीच्या १ लाख शिधासंचांचे वाटप केले जाणार असून, यामध्ये सर्वाधिक बीड जिल्ह्यातील कामगारांचा समावेश असून बीड सह नाशिक, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जळगाव, जालना, अहिल्यानगर, परभणी या दहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला असून संपूर्ण वितरण प्रक्रियाची जबाबदारी संबंधित जिल्ह्याच्या समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी अजितदादा पवार तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांसह सरकारचे आभार मानले असून या योजनेतून प्रत्येक नोंदणीकृत ऊसतोड कामगारांच्या कुटुंबाला लाभ मिळावा, अशी विनंती केली आहे.

------------

### इन्स्टाग्राम-यूट्यूबविरोधात

संबंध असल्याचे अनेक संशोधनांतून आणि अभ्यासांमधून समोर आले आहे.इन्स्टाग्राम आणि यूट्यूबने जाणीवपूर्वक अशा डिझाइन वैशिष्टयांचा वापर खुबीने केला आहे, जे मानवी मेंदूतील 'रिवॉर्ड सिस्टीम' सक्रिय करतात. यामध्ये अखंड स्क्रोलिंग, ऑटोप्ले व्हीडीओ, सतत बदलणारे अल्गोरिदम, 'लाईक्स' आणि नोटिफिकेशन्स यांचा समावेश आहे. हे सगळे घटक वापरकर्त्याला ऍपवर जास्त वेळ घालवण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत, असा याचिकाकर्त्यांचा आरोप आहे.फिर्यादी पक्षाचे वकील मार्क लॅनिअर यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, 'प्रत्येक स्वाइप म्हणजे स्लॉट मशीनचे हँडल ओढण्यासारखेच आहे. पुढे काय दिसेल, हे माहीत नसते, पण तरीही मेंदूला मिळणारे उत्तेजन निश्चित असते. मानसशास्त्रज्ञांच्या मते, अशा 'व्हेरिएबल रिवॉर्ड' प्रणालीमुळे डोपामिनचे स्राव वाढतात आणि व्यसनसदृश वर्तन तयार होते. फिर्यादीचा दावा आहे की याच प्रक्रियेमुळे केजीएमला तीव्र चिंता, शरीराबाबत न्यूनगंड निर्माण होऊन मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले.

----------

### कांद्याच्या पिकात लपवून

कांद्याच्या पिकामध्ये अफूची लागवड करण्यात आली होती. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून ही शेती उघडकीस आणली. पोलिसांनी तत्काळ पंचनामा करून संपूर्ण अफूची झाडे जप्त करत शेती नष्ट केली. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५/२०२६ अन्वये कलम ८(सी), १८ एनडीपीएस अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार व वाशी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनी कासार, सपोनी यशवंत घोडके, अंमलदार शौकत पठान, जावेद काझी, कपील बोरकर, गणेश खैरे, श्रीनिवास घुले, विकास जगताप व ज्योती बहीरवाल यांचा संयुक्त पथकात समावेश होता. धाराशिव जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात पोलिसांनी उचललेले हे ठोस पाऊल मानले जात असून, अशा बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

------------

# चकलांबा येथील पंचाळेश्वर महादेव मंदिरात आजपासून शिवरात्रीमहोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे प्रतिवर्षाप्रमाणे गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ पासून चार दिवसीय शिवरात्री महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.**

या शिवरात्री महोत्सवात नामांकित कीर्तनकार हजेरी लावणार आहेत. तर दुपारी ह.भ.प. कैलास महाराज खेडकर यांची दुपारी २.०० ते ४.३० वाजता शिवलीलामृत कथा होणार आहे. शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.वैभव महाराज जगताप यांचे कीर्तन, शनीवार दि.१४ रोजी धुराजी महाराज कोळेकर, यांचे कीर्तन, तर रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्री ८.०० ते १०.०० वेळात ह.भ.प. शिवाजी महाराज फुंदे, फुंदेटाकळी यांचे कीर्तन होणार आहे. सोमवार दि.१६ रोजी सकाळी ११.०० ते १.०० यावेळेत ह.भ.प.डॉ. गणेश महाराज शास्त्री, महंत दुर्गाशक्तीगड, भिलवडे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमास गावातील सर्व संत, महाराज, रोकडेश्वर भजनी मंडळ, कबीरपंथी भजनी मंडळ, टाळकरी, गायनाचार्य, मृदुंगाचार्य, भाविक सहभागी होतात. शिवरात्री महोत्सवाच्या या भव्य दिव्य विविध कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन चकलांबा ग्रामस्थांच्या करण्यात आले आहे.

# आढावा बैठकीत पंकजाताईंनी जालन्यासाठी वाढीव २४० कोटीच्या निधीची केली मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे हया आज उप मुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमवेत बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थित होत्या. दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत त्यांनी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याला वाढीव २४० कोटीची मागणी केली.**



मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सहयाद्री अतिथीगृहात जिल्हा नियोजन समितीची राज्यस्तरीय आढावा बैठक पार पडली. त्या अगोदर बीड जिल्ह्याची नियोजन समितीची बैठक पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या दोन्ही बैठकांना ना. पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या. बीडच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी काही महत्वाच्या सूचना बैठकीत केल्या.

**जालन्याला वाढीव निधीची मागणी**

बैठकीत पालकमंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी जालना जिल्हा वार्षिक योजनेच्या (डीपीडीसी) खर्चात आघाडीवर असल्याचे नमूद करत, मुख्यमंत्री १५० दिवस सुधारणा कार्यक्रम आणि १०० दिवसांच्या मूल्यमापनातही जिल्ह्याने अव्वल कामगिरी केल्याचे सांगितले. जालना ड्रायपोर्ट लवकरात लवकर सुरु करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे ही त्या यावेळी म्हणाल्या. २०२६-२७साठी जालना जिल्ह्यास शासनाकडून ३५९.२४ कोटी रुपयांची निधी मर्यादा कळविण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२६-२७ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मात्र, जिल्ह्यातील विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या मागणी नुसार रु ६००.०० कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा राज्यस्तरीय बैठकीत ठेवण्यात आला आहे.त्यामुळे सुमारे रु २४०.७६ कोटी रुपये अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी हा वाढीव निधी मिळावा अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना केली.

## थोडक्यात

### कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या वाढदिवसा निमित्त मोफत दातांची तपासणी शिबिराचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी



महाराष्ट्राचे प्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे चिरंजीव डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांच्या डॉ.सय्यद डेंटल क्लिनिकच्या वतीने जय भोले,हंबर्डे कॉम्प्लेक्स आष्टी जि.बीड येथे मोफत दातांची तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायं.०५ वाजेपर्यंत हे शिबिर सर्वांसाठी खुले राहणार आहे.मोफत तपासणी शिबिराचे हे तिसरे वर्ष असून पेस्ट आणि माऊथ वॉशचे मोफत वाटपही करण्यात येणार आहे.यासाठी डॉ.सय्यद हुमायुद्दीन आणि त्यांच्या सौ.डॉ.मेहवश शेख.. सय्यद,तसेच मातोश्री बेबीबानो शेख हे परिश्रम घेत आहेत. प्रतिवर्षाप्रमाणे होणाऱ्या यंदाच्या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### ग्रामीण राजकारणाची जाण असणारा धडाडीचा नेता हरपला-संगमेश्वर आंधळकर

बीड । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. ग्रामीण राजकारणाची अचूक जाण असलेला आणि सर्वसामान्यांचे प्रश्न तडीस नेणारा एक धडाडीचा नेता आपण गमावला आहे, अशा शब्दांत सामाजिक कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाराष्ट्रातील अनेक नेते शहरी राजकारणाकडे झुकलेले असताना, अजित पवार यांनी मात्र नेहमीच ग्रामीण भागाला केंद्रस्थानी मानून राजकारण केले. त्यांच्या राजकारणाची पाळेमुळे ग्रामीण भागात घट्ट रुजलेली होती, त्यामुळेच त्यांना गावगाड्याच्या प्रश्नांची जाण होती. शेती, शेतकरी आणि ग्रामीण भागातील कष्टकरी माणूस यांच्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी वेगळी होती.अजित पवार यांनी सहकार क्षेत्रात दिलेले योगदान ऐतिहासिक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या आणि जिल्हा बँकांचे जाळे अधिक भक्कम करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. सहकार क्षेत्र टिकले तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल, या विचाराने त्यांनी अनेक संस्थांना अडचणीच्या काळात मदतीचा हात दिला. केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी दुधव्यवसाय, कुक्कुटपालन यांसारख्या जोडधंद्यांकडे वळावे, यासाठी त्यांनी विशेष योजना राबवून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या जाण्याने ग्रामीण महाराष्ट्राचा एक खंदा समर्थक आणि विकासाचा मोठा आधार हरपला आहे, असेही आंधळकर यांनी नमूद केले.

### रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ




बीड : तालुक्यातील रामनगर येथे मागील १४ वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. यावर्षीही ही परंपरा कायम राखत गुरुवार, दि. १२ फेब्रुवारीपासून सप्ताहास प्रारंभ होत असून श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या पवित्र उपस्थितीत सप्ताहास प्रारंभ झाला.


या सप्ताहात दररोज पहाटे काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, भावार्थ रामायण, हरिपाठ तसेच नामांकित महाराज मंडळींची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. धार्मिक वातावरणात गाव व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सकाळी ९ वाजता गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार असून, त्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे. रामनगर ग्रामस्थांच्यावतीने आयोजित हा सप्ताह धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरत असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## स्व.अजित पवारांना अभिप्रेत अशीच कामे पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून होतील - आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्हा नियोजन समितीची दि १२ फेब्रुवारी गुरुवार रोजी ऑनलाइन पद्धतीने बैठक पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रा वहीनी पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.दिवंगत अजित दादांना श्रद्धांजली अर्पण करून या बैठकीस सुरुवात करण्यात आली.

स्व.अजित दादांना अभिप्रेत अशीच कामे होतील हा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा वहिनींनी दिला. यावेळी जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सन २०२४ - २५ चा माहे मार्च २०२५ अखेर झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. सन २०२५ - २६ चे नियोजन करत असताना बीड जिल्ह्याकरिता नियोजन विभागाने रू. ४४६.३० कोटी इतकी मर्यादा देण्यात आली होती,त्यानंतर जिल्ह्याच्या वाढीव मागणीनुसार रु. १२८.७० कोटी इतक्या भरीव वाढीसह जिल्हा वार्षिक योजना २०२५ - २६ अंतर्गत बीड जिल्ह्याकरिता



**जिल्हा नियोजन समितीच्या ऑनलाईन बैठकीस आ.सोळंके सहभागी**

५७५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.नमुना आराखडा निश्चित केल्यानुसार कामे हाती घेण्यात यावीत अशा सूचना यावेळी पालकमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी बैठकीत दिल्या.ग्रामपंचायत इमारत कार्यालय व स्मशानभूमी नसलेल्या परंतु जागा उपलब्ध असलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायत व स्मशानभूमीची कामे प्राधान्याने करण्याबाबत यावेळी निर्णय घेण्यात आला. जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सुधारण्यासाठी पंचतारांकित प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर सुरू करण्याचे प्रस्तावित असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर झालेल्या निधीचे योग्य नियोजन केल्यास १००% निधी खर्च होईल, याबाबत पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी निर्देश दिले. या संपूर्ण बैठकीत जिल्ह्यातील व मतदारसंघातील शिक्षण,आरोग्य, शेती आणि इतर भौतिक सुविधांबाबत विकासात्मक पाऊल टाकण्याच्या दृष्टीने ठोस निर्णय घेण्यात आले.अजित दादांच्या विकासाभिमुख धोरणांचा वारसा पुढे नेत, जिल्ह्यातील प्रत्येक प्रकल्प नियोजनबद्ध, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी विशेष भर या जिल्हा नियोजन बैठकीत देण्यात आला.

## पान ६ वरुन...

### स्व. अजितदादांच्या स्वप्नातील

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांना बीड जिल्हयाविषयी विशेष ओढ होती. या जिल्हयाचा कायापालट करण्याचा निर्धार त्यांनी केला होता. जिल्ह्याचा विकास करण्याचे त्यांचे ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी अधिका-यांनी एकदिलाने आणि प्रमाणिकपणे काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी या प्रसंगी केले. त्यांची विकासगंगा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल, असे त्या म्हणाल्या. यावेळी कामकाजाचा आढावा सादर करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की, सन २०२५-२०२६ साठी मंजूर नियतव्यय सर्वसाधारण गटासाठी ५७५ कोटी रूपये इतका आहे. यातील ५६५ कोटी ४१ लक्ष रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून १९९ कोटी ६४ लक्ष इतकी रकम खर्च झाली आहे. हे प्रमाण नियतव्ययाच्या ३४.७२ टक्के इतके आहे. अनूसुचित जाती योजनेंतर्गत १२९ कोटी नियतव्यय असून प्रशासकीय मान्यता ८१ कोटी ५७ लक्ष आहे. हे प्रमाण ५२.२० टक्के इतके आहे.

जिल्हा वार्षिक योजना ओटीएसपी अंतर्गत २ कोटी ३९ लक्ष रुपये निधी प्राप्त झालेला असून २ कोटी १९ लक्ष रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ६१ लक्ष रुपये खर्च झालेले आहे. खर्चाची टक्केवारी २५.६९ टक्के इतकी आहे. या बैठकीत सन २०२६-२०२७ चा प्रारुप आराखडा सादर करण्यात आला. यंदा नियोजन विभागातर्फे ४८१ कोटी ६२ लक्ष कमाल आर्थिक नियतव्यय निर्धारित करुन दिला आहे. त्यानुसार आराखडा नियोजन करण्यात आला असून आज तो बैठकीत सादर झाला. यानंतर जिल्हयाच्या वतीने दुपारी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तर बैठकीत तो सादर करण्यात आला. यात अतिरिक्त निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीने केली आहे.

### तेजस अर्बनकडून शेतकऱ्यांसाठी

अवलंबून राहावे लागणार नाही, तसेच कमी कालावधीत सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने कर्ज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.धान्य तारण योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक सभासदांनी तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, बीड येथील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शिवजन्मोत्सवाचे औचित्य

शिवप्रसाद सिरसाट यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारासाठी नवीन डिजिटल पाट्या तयार करून बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी या पाट्या सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या हस्ते बीड आगाराच्या वाहतूक नियंत्रक श्रीमती आयेशा शेख व वाहतूक नियंत्रक महेश भावसार यांच्याकडे सुपूर्त केल्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, संपादक तथा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. आत्माराम वाव्हळकर, पत्रकार प्रज्वल सिरसाट, सातपुते तसेच एसटी आगारातील कर्मचारी, बस चालक, वाहक आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना बस ओळखणे सोपे होणार असून शिवप्रसाद सिरसाट यांच्या या स्तूत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

### भागवत कथा श्रवणात

गोवर्धन कथा आदींचे वर्णन त्यांनी रसाळ वाणीतून केले.श्रीकृष्ण चरित्रातील प्रसंग भावनिक पध्दतीने सादर केले. श्रीकृष्ण पहावा, कानांनी ऐकावा, मुखाने बोलावा आणि मनात साठवावा यासाठी आपले पाय सदैव भागवत कथेकडे वळायला हवेत.प्रख्यात ग्रंथ भागवताचे नित्य श्रवण हे उत्तम गती प्राप्त करून देते. असेही ते म्हणाले. या धार्मिक कार्यक्रमासाठी निवृत्त तहसिलदार सुभाष देशपांडे,प्राचार्य रमण देशपांडे,भक्ती देशपांडे,जीवन चौसाळकर,प्रा.डॉ. गणेश पिंगळे,नरहरी देशपांडे,श्रीपाद देशपांडे,राजाभाऊ मोटेगांवकर,मंगेश जवळगांवकर,ज्योती चौसाळकर आदीसह विविध क्षेत्रातील महिला,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्व.अजितदादांचे बीड शहरात

माध्यमातून बीड जिल्ह्यातील जनतेने आश्वासक विकासाचे स्वप्न पाहिले आहे. बीड जिल्ह्याच्या इतिहासात कर्तृत्ववान पालकमंत्री म्हणून दिवंगत दादांचा नक्कीच उल्लेख होणार आहे. त्यांच्या स्मृती बीडकरांसाठी सदैव प्रेरणादायी असल्यामुळे बीड नगर परिषद कार्यक्षेत्रात दिवंगत अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी लागणारा निधी राज्यस्तरीय नियोजनातून विशेष बाब म्हणून उपलब्ध करावा, अशी मागणी या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी केली. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी त्यास मान्यता दिली असून दिवंगत अजितदादा पवार यांच्या बीड शहरातील भव्य स्मारकास त्यांनी हिरवा कंदिल दाखविला आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून दिवंगत अजितदादा पवार यांनी जोमाने विकास कामांना सुरुवात केली होती. त्यांच्या विकासाभिमुख भुमिकेमुळे बीड जिल्ह्यातील जनतेत त्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्यातील जनतेने दुःख आणि संवेदना व्यक्त केल्या, बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये स्व.अजित पवार यांच्या स्मृती कायम राहणार आहेत. भविष्यात त्यांचे विचार जिल्ह्यातील जनतेला प्रेरणादायी ठरणार असल्यामुळे त्यांचे स्मारक बीड शहरात होणे गरजेचे असून मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी या कामासाठी हिरवा कंदिल दाखविला असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले.

## किशोरी इंग्लिश स्कूलने गाजवला चंपावती महोत्सव; १० पारितोषिकांची चमकदार कमाई

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक चंपावती महोत्सवात बीड जिल्ह्यातील २९६ शाळांतील तब्बल १९ हजार ५७० बालकलाकारांनी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला व रांगोळी या विविध कला प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये किशोरी इंग्लिश स्कूल, बीड च्या १२० विद्यार्थांनी भाग घेत पुरस्कारांची लयलूट करत तब्बल १० बक्षिसे पटकावून किशोरी इंग्लिश स्कूलचे नाव उंचावले. या महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यात किशोरी इंग्लिश स्कूल आघाडीवर राहत उत्कृष्ट कामगिरी केली. या यशाबद्दत शाळेच्या चालिका डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी चिमुकल्या बालकलाकारांच्या



**डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांच्याकडून चिमुकल्या बालकलाकारांच्या पाठीवर कौतुकाची थाप**

पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

किशोरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य एम. आर. बिर्ला यांना सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाळेच्या संस्था चालिका डॉ. अदिती सुभाषचंद्रजी सारडा यांनी मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. डॉ. अदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाने आणि पाठिंब्याने हे सगळे शक्य झाले. या यशाबद्दल शाळेच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**संस्कार, गुणवत्ता आणि कलेचा संगम**

किशोरी इंग्लिश स्कूलच्या चालिका डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य देतात. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सांस्कृतिक आणि कलात्मक प्रतिभेला व्यासपीठ मिळावे, यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. महाकरंडक चंपावती महोत्सवातील यशाबद्दल त्यांनी चिमुकल्या बालकलाकारांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरित केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त कला जोपासली तरच त्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनामुळेच शाळा शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने यशाची नवी उंची गाठत आहे.

## घाटनांदूर-अंबाजोगाई-श्रीगोंदा रेल्वे मार्ग फक्त कागदावरच

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई आणि परिसरातील जनतेची गेल्या ४० वर्षांपासूनची रेल्वे मार्गाची मागणी या वर्षीच्या रेल्वे अर्थसंकल्पातही धुडकावण्यात आली आहे. घाटनांदूर-अंबाजोगाई-श्रीगोंदा या प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी कोणतीही आर्थिक तरतूद न केल्याने परिसरातील विकास खुंटला आहे. धार्मिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेल्या अंबाजोगाई शहरात रेल्वे



नसल्याने हजारो प्रवाशांना खासगी बसेसचा महागडा प्रवास करावा लागत आहे. योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक आणि पुणे-मुंबईला जाणारे नोकरदार यांची यामुळे मोठी गैरसोय होत आहे. सरकारने वारंवार दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये सरकारविरोधात मोठी नाराजी पसरली असून, विकासासाठी या रेल्वे मार्गाची तातडीने गरज असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

## मोठेवाडी जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचा जल्लोष,स्नेह संमेलन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

भरतनाट्यम्, कोळीगीते,कोकरू नृत्य,आदिवासी नृत्य,देशभक्तीपर गीतांवर नृत्य तसेच विविध वेशभूषा सादर करत माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी सांस्कृतिक कार्यक्रम पीएमश्री जि.प.केंद्र प्रा.शाळेतील विद्यार्थ्यांनी 'जल्लोष' साजरा केला.मोठेवाडी शाळेने पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमांची कास धरली आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रत्येक मुलाचा सहभाग कसा राहील, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले.या संमेलनाला विद्यार्थी,पालक आणि नागरिकांनी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या दर्जेदार कला सादरीकरणाला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली.विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी असे कार्यक्रम वारंवार केले जावेत,अशी अपेक्षा गटशिक्षण अधिकारी रविंद्र महामुनी यांनी व्यक्त केली. सांस्कृतिक कार्यक्रम पीएमश्री जि




प.के.प्रा.शा. बडिबाडी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंधुताई नाथा रासवे तर मंडळ अधिकारी लोभाजी भोरजे,ग्रामसेवक बिभीषण डोरले,सरपंच सत्यभामाबाई दळवी,उपसरपंच सुभद्राबाई अंगदराव खेत्री, माजी जि.प. सदस्य शिवप्रसाद खेत्री, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा माजी सरपंच अविनाश गोंडे,चेअरमन संभाजी चव्हाण,उपाध्यक्ष विलास खेत्री सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सतीश डोणे यांनी केले, स्वागत गीत वसंत टाकणखार व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक टि. एन. शिंदे यांनी केले उद्घाटनपर मार्गदर्शन मा. गटशिक्षणाधिकारी माजलगाव, लोभाजी भोरजे व अविनाशजी गोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सांस्कृतिक सूत्रसंचालन शिवाजी व्यवहारे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी श्रीमती रूपाली बडवे,श्रीमती मनीषा गुळवे यांनी विद्यार्थ्यांचे गीत बसवले. कार्यक्रमाचे आभार शिक्षक गेणु पवार यांनी मांनले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.पी. राठोड, उत्तमराव ढवळे, शाळा व्यवस्थापन समिती व समस्त गावकरी यांनी सहकार्य केले.

## इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात साजरे करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती




वैद्यकीय अधिकारी डॉ केवश सारूक,श्री.नागरगोजे साहेब गटविकास अधिकारी केज,प्राचार्य हनुमंत सौदागर,उमाकांत भुसारी,डॉ.शिवाजी मस्के,श्री.राजाभाऊ खरबड,तर प्रमुख उपस्थिती म्हणुन सरपंच श्री.सुरेश नांदे,सरपंच,श्री.युवराज ढोबळे,सरपंच श्री.अंगद इंगळे,सरपंच श्री.विश्वास शिनगारे,सरपंच श्री.रूस्तूम चौधरी,श्री.राजाभाऊ यादव,श्री.अरूण राऊत संचालक कृ.उ.बा.स.केज युवानेते किरण सातपुते,उपसरपंच,श्री.गणेश नांदे,सरपंच श्री.प्रविण पवार तसेच ग्रा.पं.सदस्य श्री.आशोक चोपणे,श्री.काशीनाथ खरबड,प्रविण वैरागे,श्री.दादा निकम,श्री.विजयकुमार राऊत,श्री.सिद्धेश्वर डोंगरे हे उपस्थिती होते.


यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीचे व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी गणेश वंदना करून कार्यक्रमाची सुरुवात केले.यानंतर चिमुकल्यांनी देवा मला शाळेत जायचं हाय व मेरा वाला डान्स ओम शांती ओम हवा हवा ए हवा,चिंताता चिता,न सांगताच आज हे कळे मलाचाकर शिवबाच होणारगाडी घुंगराचीबायकोने उपवास केला अशा उपहासात्मक गाण्यावर नृत्य सादर केले तर काही विद्यार्थ्यांनी बुर्गुंडा होईल हे भारूड सादर करून लोककलेतून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी,विकास जाधव,महादेव सौंदणे,रमेश सौंदणे,लक्ष्मण दोडके,शिवराज स्वामी,शिवदास खरबड,ओम खरबड,पंकज माने,रत्नलिंग लोखंडे,संदिप जोशी,आनिल निकम,बाळासाहेब सपकाळ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.तर कार्यक्रमाचे सुत्रसंचाल सौ.अंजली तानगे यांनी केले.




# जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलनाचे मुंबईत आयोजन

मुंबई : महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणांतर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन' (एआय फॉर ॲग्री २०२६) ही परिषद २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे.


कृषी क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित होते. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषी विकासाच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा मानली जाणारी एआय फॉर ॲग्री २०२६ ही जागतिक परिषद येत्या २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. एआय फॉर ॲग्री ही परिषद वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, एफएओ,



युएनडीपी, आयएफएडी, वर्ल्ड बँक समूह, आशियाई विकास बँक (एडीबी), इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्सिटीट्यूट फॉर दी सेमी-ॲरिड ट्रापिक्स (आयसीआयएसएटी), भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी), एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) जागतिक व राष्ट्रीय भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. राज्यात जाहीर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' च्या अंमलबजावणीकडे टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. या एआय धोरणाच्या निर्मितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीतून शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची प्रेरणा मिळाली. कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था आदींसाठी एक व्यासपीठ म्हणून परिषदेचा उपयोग करून घेता येईल, असे त्यांनी सांगितले.

विविध चर्चासत्रांचे आयोजन : एआय फॉर ॲग्रीमध्ये दोन दिवस विविध चर्चासत्रांचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये कृषी व अन्न प्रणाली परिवर्तनासाठी प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, महिला शेतकऱ्यांसाठी समावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता : सक्षमीकरण, समता आणि नेतृत्व, ॲग्री एआयसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा : डेटा, विश्वास, ट्रेसिबिलिटी आणि प्लॅटफॉर्म्स, ॲग्री एआय मधील गुंतवणूक : बाजारपेठा आणि विस्तारक्षम नवोन्मेष, जागतिक वैज्ञानिक सहकार्य आणि एआय फॉर ॲग्री संशोधन नेटवर्क, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदार वापर, धोरणात्मक मार्ग आणि जागतिक प्रशासन याविषयांचा समावेश आहे.

## संपुर्ण जगात नावाजलेली ड्रॅगन कोंबडी



भारतात चिकनचे अनेक एवढ्या प्रकारचे चिकनचे प्रकार आहेत की त्याच्या चवीप्रमाणेच त्या ठिकाणाहून ते प्रसिद्ध आहेत. शिवाय त्याच्या जातीवरून त्याच्या किमतीही ठरलेल्या आहेत. पण एक लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचे चिकन सुद्धा जगात उपलब्ध आहे. याला ड्रॅगन कोंबडी असे म्हणतात. कुठल्या कोंबडीचं चिकन लाखभर रुपयाचं आहे! पण हे खरंय. व्हिएतनाम देशात सापडलेल्या एका कोंबडीची किंमत लाखोंमध्ये आहे. या कोंबडीच्या जातीचं नाव डोंग ताओ असं आहे. ज्याला ड्रॅगन चिकनही म्हटलं जातं. या कोंबडीला विकत घ्यायचं असेल तर त्या किमतीत आपल्याकडच्या सगळ्यात महाग कडकनाथ चिकनच्या २०० कोंबड्या खरेदी करता येईल एवढी या ड्रॅगन कोंबडीची किंमत आहे. जगातल्या सर्वात महागड्या कोंबड्यांमध्ये ही कोंबडी आता गणली जाऊ लागली आहे. व्हिएतनाममध्ये जरी सापडली असली तरी याच्या वाढत्या मागणीमुळे जगभरातल्या पोल्ट्री व्यवसायिकांनी या कोंबडीचे पालन करण्यास सुरुवात केली आहे.

काय वेगळंय या कोंबडीत? डॉन्ग टाओ या ड्रॅगन कोंबडीचं पालन व्हिएतनाम देशात आधी सुरु झालं. शेताच्या एका भागात या जातीच्या काही कोंबड्या पाळल्या. या कोंबड्यांचे पाय ही सामान्य कोंबड्यांपेक्षा वेगळे आहेत काहीसा मोठा आकार आणि दिसायला तपकीरी विटेसारखे. याच खास गुणधर्मामुळे जगभरात या ड्रॅगन कोंबडीला प्रचंड मागणी असते. परदेशात नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनमध्ये या कोंबडीचं चिकन जगात सर्वात महाग आहे.

मेदाची मात्रा कमी : या कोंबडीत असलेली मेदाची मात्रा कमी असल्याने ड्रॅगन कोंबडीला खाणं लोक पसंत करत आहेत. यासोबतच या कोंबडीचं वजन इतर कोंबड्याच्या तुलनेत अधिक आहे. साधारण १० किलोया या चिकनमध्ये फॅटही कमी असल्याने याला मागणी वाढती आहे.स्वादिष्ट चव : ड्रॅगन कोंबडीची चवीला स्वादिष्ट असल्याने या कोंबडीला असणारी मागणी अधिक आहे. प्रोटीनने भरपूर असणारे याचे चिकन तरुणांमध्ये लोकप्रीय होत आहे

## लिंबू फळांमध्ये कॅन्कर रोगापासून करा लिंबाचा बचाव, अन्यथा होईल मोठे नुकसान

फळबागा लागवडीतून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळत असल्याने देशात फळबागांचे क्षेत्र वाढत आहे. लिंबू फळबागाही मोठ्या प्रमाणात वाढायला लागल्या आहेत. मात्र लिंबाच्या बाळबागांवर आता काही प्रमाणात रोगाचा हल्ला होईला लागला आहे. गेल्या काही दशकांमध्ये लिंबू लागवड शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झाली आहे. ज्याचे मुख्य कारण म्हणजे लिंबू हे प्रमुख नगदी पीक आहे. अशा स्थितीत लिंबू लागवडीकडे शेतकऱ्यांचा कलही वाढला असून लिंबूचे उत्पादन घेऊन शेतकरी नफाही मिळवत आहेत. परंतु, लिंबू लागवडीत शेतकरी नफा तेव्हाच मिळवू शकतात जेव्हा त्यांनी काही आवश्यक खबरदारी घेतली. ज्यामध्ये पहिली खबरदारी म्हणजे लिंबू रोपाचे रोगापासून संरक्षण करणे. शेतकऱ्यांनी लिंबू रोपाचे रोगापासून संरक्षण केले नाही तर नुकसान निश्चित आहे.

लिंबू वनस्पतींमध्ये आढळणारा असाच एक प्रमुख रोग म्हणजे लिंबूवर्गीय कॅन्कर हा रोग काय आहे, या रोगाचा लिंबू झाडांवर परिणाम होतो. लिंबू वनस्पतींवरील लिंबूवर्गीय कॅन्कर या रोगाविषयी म्हटले जाते की, हा रोग एकदा लिंबू झाडांमध्ये आढळून आला की, विविधतेनुसार उत्पादनात ५ ते ३५ टक्के नुकसान होऊ शकते. हा रोग लहान झाडांवर तसेच वाढलेल्या झाडांवर हल्ला करतो. रोपवाटिकांमधील कोवळ्या झाडांमध्ये, रोगामुळे गंभीर नुकसान होते. रोगाचा गंभीर परिणाम होऊन पाने गळून पडतात आणि तीव्र प्रादुर्भावात संपूर्ण झाड मरते. हा रोग पाने, फांद्या, काटे, जुन्या फांद्या आणि फळांवर परिणाम करतो. तर लिंबू फळांवर डाग पडतात. हा रोग प्रथम पानांवर लहान, पाणचट, अर्धपारदर्शक पिवळा डाग म्हणून दिसून येतो, असे ते म्हणाले. जसजसे डाग परिपक्व होतात तसतसे पृष्ठभाग पांढरा किंवा तपकिरी होतो आणि शेवटी मध्यभागी क्रॅक होऊन खडबडीत, कडक, कॉर्कसारखे आणि खड्ड्यासारखे बनते. त्यांनी पुढे सांगितले की ज्या फळांवर डाग तयार होतात त्या फळांमध्ये हा रोग पसरतो. कॅन्कर्स संपूर्ण पृष्ठभागावर विखुरलेले असू शकतात किंवा अनेक कँकर्स एकत्रितपणे अनियमित स्कर्व्ही वस्तुमान तयार करू शकतात. गव्हाच्या या देशी वाणाची योग्य वेळी पेरणी केली तर कराल मोठी कमाई; पावसातही राहते सुरक्षित फळे आणि पाने अकाली गळतात : लिंबू वनस्पतींमध्ये लिंबूवर्गीय कॅन्कर हा सर्वात महत्त्वाचा रोग आहे, जो या जिवाणूमुळे होतो, हा जिवाणू मानवासाठी हानिकारक नाही, लिंबाच्या झाडांची जीवनशक्ती नष्ट करतो. उपचार कसे करावे : हे रोग टाळण्यासाठी रोगाने बाधित पडलेली पाने आणि फांद्या गोळा करून जाळल्या पाहिजेत. नवीन फळबागांमध्ये लागवड करण्यासाठी रोगमुक्त रोपवाटिका साठा वापरावा. नवीन फळबागेत लागवड करण्यापूर्वी झाडांवर ब्लाइटॉक्स ५०२ ग्रॅम/लिटर पाणी आणि स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम/३ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जुन्या बागांमध्ये पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रभावित वनस्पतींच्या भागांची छाटणी आणि हवामानाच्या परिस्थितीनुसार ब्लाइटॉक्स ५० + स्ट्रेप्टोमायसिनची ठराविक कालावधीने फवारणी केल्यास रोग नियंत्रणात येतो. ब्लिटॉक्स ५० + स्ट्रेप्टोमायसिनची फवारणी प्रत्येक नवीन पानांच्या फुलानंतर लगेच करावी. रोपाची शक्ती नेहमी योग्य सिंचनाने राखली पाहिजे. खताचा जास्तीत जास्त फायदा झाडाला होईल अशा पद्धतीने करावा.



## पिकाच्या गरजेनुसार योग्य शेडनेटची निवड

पिकांचे ऊन, वारा आणि पावसापासून संरक्षण करण्यासाठी शेडनेटची टक्केवारी अत्यंत महत्त्वाची असते. ही टक्केवारी म्हणजे जाळीतून गाळून येणारा सूर्यप्रकाश किती रोखला जातो, याचे प्रमाण असते. लक्स मीटरच्या साह्याने शेडनेटची टक्केवारी मोजणे ही सर्वांत अचूक पद्धत आहे.

शेडनेटवर असलेली टक्केवारी ही ती जाळी किती प्रमाणात सूर्यप्रकाश अडवते हे दर्शविते. शेडनेट टक्केवारीचा साधा आणि सोपा अर्थ म्हणजे शेडनेटमधून पडणाऱ्या सावलीचे प्रमाण. जर तुम्ही ५० टक्के शेडनेट वापरत असाल, तर त्याचा अर्थ असा, की ती जाळी ५० टक्के सूर्यप्रकाश अडवते आणि उरलेला ५० टक्के प्रकाश पिकांपर्यंत पोहोचू देते. लक्स मीटरच्या साह्याने शेडनेटची टक्केवारी मोजणे ही सर्वांत शास्त्रोक्त आणि अचूक पद्धत आहे. यात आपण सूर्यप्रकाशाची तीव्रता मोजून गणिती सूत्राचा वापर करतो. खालील पद्धतीने आपण शेडनेटची टक्केवारी तपासू शकतो.

बाहेरच्या वातावरणातील प्रकाश मोजणी : प्रथम शेडनेटच्या बाहेर, जिथे थेट सूर्यप्रकाश पडत आहे अशा ठिकाणी लक्स मीटर धरावा. मीटरचा सेन्सर सूर्याच्या दिशेने असावा. शेडनेटच्या आतमध्ये जावे आणि नेटच्या खाली साधारण २ ते ३ फूट



अंतरावर रीडिंग घ्यावे. पिकाला दिवसाला किती तास आणि किती तीव्र सूर्यप्रकाश लागतो, याचा अभ्यास करावा.

जर तुम्ही खूप उष्ण भागात राहत असाल, तर जास्त टक्केवारीची (उदा. ७५ टक्के) जाळी निवडावी. यूव्ही स्टॅबिलाइज शेडनेट निवडावे. ते कडक उन्हात लवकर फाटत नाही.

दृश्य तपासणी : ही सर्वांत सोपी पण प्राथमिक पद्धत आहे. यात शेडनेटच्या विणकामाची घनता पाहिली जाते. शेडनेटमधील दोन धाग्यांच्या अंतरावरून टक्केवारी ओळखता येते. यासाठी अनुभव असणे गरजेचे आहे.

टक्केवारी धाग्यामधील अंतर : ३० टक्के - दोन धाग्यांमधील अंतर जास्त असते. त्यामुळे भरपूर प्रकाश आरपार जातो. ५० टक्के - दोन धाग्यांमधील अंतर मध्यम असते. हे प्रामुख्याने रोपवाटिका किंवा सामान्य पिकांसाठी वापरले जाते. ७५ ते ९० - टक्के दोन धाग्यांमधील अंतर खूपच जवळ असते. यात आरपार पाहणे कठीण असते आणि प्रकाश खूपच कमी येतो. म्हणजेच सावली जास्त पडते.

कंपनी लेबल / टॅग : शेडनेटच्या बंडलवर ५० टक्के, ७५ टक्के, ९० टक्के असे छापलेले असते. आयएसआय मार्क, निर्माता कंपनीचे नाव आणि जीएसएम माहिती दिलेली असते यावरूनही आपण शेडनेटची टक्केवारी ओळखू शकतो.

शेडनेटचे वजन : समजा आपण शेडनेटचा एक बाय एक मीटर आकाराचा तुकडा घेतला आणि त्याचे वजन केले, तर ते खालील प्रमाणे असू शकते. शेडनेटच्या प्रकारानुसार व टक्केवारी नुसार वजन वेगवेगळे भरते.




### जागतिक दिवस
### सरोजनी नायडू यांची जयंती.
### व्हॅलेंटाईन आठवड्याचा सातवा दिवस (कीस डे)

### महत्वाच्या घटना

१६३० : आदिलशाही आणि निजामशाही संपवण्याच्या उद्देशाने मुघल बादशहा शहाजहान मध्य प्रदेशातील बुर्हाणपूर येथे पोहोचला.
१६६८ : स्पेनने पोर्तुगालच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१७३९ : कर्नालची लढाई पर्शियाच्या नादिरशहाने मुघलांच्या मुहम्मदशहावर तीन तासांत विजय मिळवला. या विजयामुळे नादिरशहाचा दिल्लीत येण्याचा मार्ग सुकर झाला.
१९३१ : आजच्या दिवशी दिल्ली ला भारताची राजधानी घोषित करण्यात आली.
१९४८ : आजच्या दिवशी गांधीजीनी आमरण उपोषणास सुरुवात केली.
१९८४ : युरी आन्द्रेपॉव्ह यांच्यानंतर कॉन्स्टान्टीन चेरेनेन्को सोविएत संघाचे अध्यक्ष झाले.
१९८८ : कॅनडात कॅल्गारी येथे वे१५ हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.
२००१ : पहिले मानव रहित अंतरिक्षयान एरोस नावाच्या लघुग्रहावर उतरले.
२००३ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यश चोप्रा यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान
२०१० : पुणे येथे दहशतवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात १७ ठार, ६० जखमी

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६६ : थॉमस माल्थस प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ डिसेंबर १८३४)
१८३५ : मिर्झा गुलाम अहमद अहमदिया पंथाचे संस्थापक (मृत्यू: २६ मे १९०८)
१८७९ : सरोजिनी नायडू प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी, रौलेट कायदा, मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार, असहकार आंदोलन यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. (मृत्यू: २ मार्च १९४९)
१८९४ : वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे इतिहासकार (मृत्यू: १६ जुलै १९८६)
१९१० : दत्तात्रयशास्त्री धुंडिराज तथा 'दत्तमहाराज' कवीश्वर वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदांती पंडित (मृत्यू: १ मार्च १९९९)
१९११ : फैज अहमद फैज लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (मृत्यू: २० नोव्हेंबर १९८४)
१९१६ : भारतीय सेनेतील सेवानिवृत्त लेफ्टिनेंट जनरल जगजीत सिंह अरोड़ा यांचा जन्म.
१९४५ : विनोद मेहरा अभिनेता (मृत्यू: ३० आक्टोबर १९९०)
१९७६ : भारतीय चित्रपट अभिनेता शरद कपूर यांचा जन्म.
१९७८ : भारतीय चित्रपट अभिनेता अश्मित पटेल यांचा जन्म.
१९८७ : तमिळनाडू चे माजी मुख्यमंत्री एम. भक्तवत्सलम यांचे निधन.
१९९५ : धावपटू वरुणसिंग भाटी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : रिचर्ड वॅग्नर जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक (जन्म: २२ मे १८१३)
१९०१ : लक्ष्मण बापूजी ऊर्फ 'भाऊराव' कोल्हटकर गायक नट (जन्म: ९ मार्च १८६३)
१९६८ : गोपाळकृष्ण भोबे संगीत समीक्षक, गीतकार व कथालेखक
१९७४ : 'सूर रंग' उस्ताद अमीर खाँ इंदौर घराण्याचे संस्थापक व गायक (जन्म: १५ ऑगस्ट १९१२)
२००८ : राजेन्द्र नाथ हिन्दी व पंजाबी चित्रपटांतील विनोदी अभिनेते (जन्म:१९३१)
२०१२ : अखलाक मुहम्मद खान उर्फ कवी शहरयार ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी (जन्म: १६ जून १९३६)

## कांदा बीजोत्पादन वाढण्यासाठी व्यवस्थापन

कांदा हे प्रमुख नगदी पीक असून, शेतकरी मोठ्या प्रमाणात कांदा बीजोत्पादन करतात. मात्र यंदा मधमाशांची संख्या लक्षणीय घटल्याने कांदा बीजोत्पादनावर गंभीर परिणाम होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.



कांदा पिकामध्ये परागीभवनासाठी मधमाशांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मधमाशांच्या मदतीने योग्य परागीभवन झाले तर बीजधारणा चांगली होते आणि उत्पादन दर्जेदार मिळते. गेल्या काही वर्षापासून कीटकनाशकांचा अतिवापर, हवामानातील अचानक बदल, अवकाळी पाऊस तसेच नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्याने मधमाशांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याचा थेट परिणाम कांदा फुलोऱ्यावर होत असून, फुले उमलूनही अपेक्षित प्रमाणात बीजधारणा होत नाही. परिणामी उत्पादन खर्च वाढूनही शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित बीजोत्पादन येत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी यंदा कांदा बीजोत्पादनासाठी मोठी गुंतवणूक केली होती. मात्र मधमाशांची संख्या कमी असल्याने उत्पादनात ३० ते ४० टक्के घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी मधमाशांचे संवर्धन करण्यासाठी कीटकनाशकांचा वापर मर्यादित करणे, नैसर्गिक शेतीकडे वळणे तसेच मधमाशी पालनाला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. शासनानेही याबाबत मार्गदर्शन व मदत दिल्यास कांदा बीजोत्पादनातील ही समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# गटविकास अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे प्रधानमंत्री योजनेचे हप्ते रखडले?

जालना। प्रतिनिधी

अंबड पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री घरकुल योजना पात्र लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर करण्यात आले होते परंतु काही लाभार्थी पात्र नसताना पात्र करण्यात आले होते हा सर्व प्रकार गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली झाल्याचे बोलले जात आहे. आता लाभार्थ्यांनी घरकुल योजनेचे बांधकाम केले असून त्यांचा दुसरा हप्त्याची रक्कम येत नसल्यामुळे संबंधित लाभार्थी यांच्यावर व्याजाने पैसे घेण्याचे वेळ आली आहे तसेच काही महिलेने सोनू ठेवून व्याजाने पैसे काढले आहेत काही लाभार्थ्यांच्या मागे मिस्तरी सिमेंट दुकानदार तगादा लावत आहे. तसेच या सर्व प्रकरणी अंबड पंचायत समितीचे काही लोकांनी दुसरा हप्ता टाकण्यासाठी टक्केवारी घेतल्याचे चर्चा ऐकायला येत आहे. याच्या तक्रारी गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड यांच्याकडे करण्यात आलेले आहे परंतु या संदर्भात काहीच कारवाई होत नाही यावरून दिसून येत आहे.




अंबड तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत मंजूर लाभार्थ्यांचे हप्ते ''स्पर्श प्रणाली''नुसार वितरित न होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून या संदर्भात शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना ईमेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू विजय छल्लारे यांनी पाठविलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,दि.२९ नोव्हेंबर २०२५ पासून अंबड तालुक्यातील अनेक पात्र लाभार्थ्यांचे मंजूर हप्ते वितरित झालेले नाहीत.जियो टॅग फोटो अपलोड,क्षेत्रीय पडताळणी तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून डी.एस.सी.प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही प्रस्ताव राज्यस्तरावर ''होल्ड'' ठेवले जातात आणि काही दिवसांनी कोणतेही स्पष्ट लेखी कारण न देता ''रिजेक्ट'' करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सन २०२४ -२५ व २०२५ -२६ या दोन वर्षांसाठी अंबड तालुक्याला एकूण १६,७८६ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते.त्यापैकी १६,३४२ घरे मंजूर झाली असली तरी पूर्णत्वास गेलेली घरे केवळ ९६२ इतकी असून पूर्णता टक्केवारी अवघी ५.८९ टक्के आहे.मंजूर घरांच्या तुलनेत पूर्ण झालेल्या घरांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने हप्ते वितरणातील विलंब हा मुख्य अडथळा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हप्ते वेळेत न मिळाल्याने अनेक लाभार्थ्यांनी घरबांधणी सुरू ठेवण्यासाठी खासगी कर्ज घेतल्याचे सांगितले जात आहे.वाढत्या व्याजामुळे आर्थिक ताण वाढत असून मिळणारा हप्ता हा व्याजफेडीतच जात असल्याने प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण होण्यात अडचणी निर्माण होत आहेत.परिणामी शासनाच्या उद्दिष्टपूर्तीवर परिणाम होत असून प्रशासनावरील जनतेचा विश्वासही डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,मंजूर लाभार्थ्यांना निर्धारित टप्प्यानुसार निधी देणे शासनासाठी बंधनकारक आहे.कोणतेही लेखी कारण न देता पेमेंट ''रिजेक्ट'' करणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना बाधक असून प्रशासकीय निष्काळजीपणाचे द्योतक आहे.या प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून सर्व प्रलंबित हप्ते तात्काळ वितरित करावेत,अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी योग्य ती कारवाई न झाल्यास लाभार्थ्यांच्या हक्कसंरक्षणासाठी न्यायालय अथवा लोकायुक्तांकडे दाद मागण्याचा पर्याय अवलंबावा लागेल,असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.अंबड तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांचे लक्ष आता राज्य शासनाच्या भूमिकेकडे लागले असून,लवकरात लवकर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा या निवेदनात व्यक्त केली जात आहे.

## बालविवाहमुक्त जिल्ह्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न

### जिल्हाधिकारी मित्तल यांच्या हस्ते चित्ररथाचा शुभारंभ





जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात बालविवाहाची प्रथा समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी कंबर कसली आहे. जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय आणि इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या 'बालविवाह निर्मूलन चित्ररथा'ला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी मित्तल यांनी स्वतः चित्ररथावर स्वाक्षरी करून मोहिमेला शुभेच्छा दिल्या आणि महिला व बाल विकास विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. हा चित्ररथ संपूर्ण जिल्ह्यात, विशेषतः जालना शहर आणि ८ तालुक्यांमध्ये फिरणार आहे. ज्या गावांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे, तिथे या चित्ररथाच्या माध्यमातून विशेष लक्ष दिले जाईल. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन तरुण पिढीला बालविवाहाच्या दुष्परिणामांची माहिती दिली जाणार आहे. चित्ररथावर लावलेले माहितीपूर्ण पोस्टर्स, बालविवाह रोखण्यासाठीची शपथ आणि जनजागृतीपर गाणी याद्वारे नागरिकांचे प्रबोधन केले जाईल. बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून, असा प्रकार घडत असल्यास तातडीने १०९८ या क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. या प्रसंगी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. व्ही. कड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, सुभाष कुलकर्णी, अमोल राठोड, उमेश कुटे, उद्धव खरात, कवीश्वर नेरे, सचिन चव्हाण आणि विनोद दाभाडे उपस्थित होते. तसेच इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीचे जिल्हा समन्वयक नितीन जह्राड, संस्थेचे कर्मचारी आणि चाईल्ड हेल्पलाईनचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## || थोडक्यात



### माहेश्वरी महिला संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा माहेश्वरी महिला संघटनेची सन २०२६-२९ या काळासाठी कार्यकारिणी निवडण्यात आली असून, अध्यक्षपदी नूतन संजय दाड, सचिवपदी सुनीता मालपाणी, कोषाध्यक्षपदी सुवर्णा करवा तर संघटन मंत्री म्हणून राजेश्री भक्कड यांची निवड करण्यात आली आहे.येथील महेश भवनात संघटनेच्या माजी प्रदेशाध्यक्षा निर्मला करवा, निवडणूक पर्यवेक्षक तथा महाराष्ट्र प्रदेश सचिव सुनीता चरखा यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी निवडण्यात आलेल्या उर्वरित कार्यकारिणीत वरिष्ठ उपाध्यक्ष अनुराधा गट्टाणी (अंबड), उपाध्यक्ष शिल्पा मालपाणी (परतूर), पद्मा तापडिया (बदनापूर), शीतल मुरक्या (मंठा), श्रध्दा लोहिया (जालना), सहसचिव सपना तापडिया (कुंभार पिंपळगाव), शारदा बाहेती (आष्टी), सौ. मानधना (तिर्थपुरी) यांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी मावळत्या अध्यक्षा किरण राठी यांनी नूतन दाड यांच्याकडे पद्भार सुपूर्द केला. यावेळी जिल्हा संघटनेच्या रघुकुल सिध्दा समिती प्रमुख निर्मला साबू यांच्यासह मीनाक्षी दाड, वीणा लाहोटी, शकुंतला मंत्री, प्रमिला मंत्री, मंगल मालपाणी, किरण मुंदडा, मंगल लाहोटी, राजेश्री दरक, संगीता मुंदडा, शोभा तोतला, सुशीला राठी यांच्यासह जिल्हाभरातील महिला संघटनच्या पदाधिकारी आणि महिला-भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### सोमवारी महिला लोकशाही दिन

जालना। प्रतिनिधी

महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत 'जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले आहे.ज्या महिलांना आपल्या तक्रारी किंवा प्रश्न मांडायचे आहेत, त्यांनी आपले अर्ज दोन प्रतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे सादर करावेत. महिलांनी प्रथम संबंधित तहसीलदार यांच्याकडे लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी तक्रार नोंदवावी. तालुका स्तरावर तक्रार केल्यानंतर एका महिन्याच्या आत कार्यवाही न झाल्यास, संबंधित महिला जिल्हास्तरीय लोकशाही दिनात आपली तक्रार मांडू शकतात. तहसीलदार आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी तक्रारदारास एका महिन्याच्या आत अंतिम उत्तर देणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील पिडीत महिलांनी आपल्या तक्रारींसाठी तालुकास्तरावर तहसील कार्यालय आणि जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय किंवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांनी कळविले आहे.

### रोजगार मेळाव्याचे आयोजन

अंबड। प्रतिनिधी

सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील उमेदवारांनी रोजगार मेळाव्याच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी केले आहे. उमेदवारांनी सोबत बायोडाटा (५ प्रती), शैक्षणिक कागदपत्रे आणि आधारकार्डच्या छायांकित प्रती घेऊन उपस्थित राहावे. या मेळाव्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे केवळ नोकरीच नाही, तर स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणाऱ्या विविध महामंडळांचे स्टॉल्स येथे लावले जाणार आहेत. रोजगार मेळाव्यात पाच नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करणार आहेत.

## पैठण शहरात १०० अतिक्रमणे पाडली, अजून तीन दिवस मोहीम

पैठण। प्रतिनिधी

संत एकनाथ महाराज यांचा नाथषष्ठी सोहळा आणि शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने अतिक्रमणाविरुद्ध बुधवारपासून (दि. ११) मोहीम सुरू केली आहे. पहिल्याच दिवशी शंभरच्यावर अतिक्रमणे नाथ मंदिर परिसरातून काढण्यात आल्याचे मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे यांनी सांगितले. याच आठवड्यात शहरातील सर्व अतिक्रमणे काढली जाणार आहेत. मुख्य रस्त्यांवरील अडथळे दूर करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी ही मोहीम मोठ्या पोलिस बंदोबस्तात हाती घेण्यात आली असल्याचे मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे यांनी सांगितले.

प्रमुख मार्गांवर गेल्या अनेक वर्षांपासून विविध प्रकारची अतिक्रमणे वाढत आहेत. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यानुसार नगरपालिकेने सर्वेक्षण पूर्ण केले आहे. संबंधित अतिक्रमणधारकांना दिलेल्या मुदतीत अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते, परंतु अनेकांनी याकडे दुर्लक्ष केल्याने बुधवारी नाथ मंदिराच्या परिसरातील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात करण्यात आली. या मोहिमेदरम्यान रस्त्यावर उभ्या असलेल्या फळ विक्रेत्यांच्या हातगाड्या, दुकानाबाहेरील साहित्य, रस्त्यालगत बांधलेले ओटे, लोखंडी जाळ्या व शेड, अनधिकृत जाहिरात फलक, वाढीव छपरे तसेच रस्त्यावर अडथळा ठरणारी कच्ची-पक्की बांधकामे हटविण्यात येणार आहेत. आता शहराचे सौंदर्य अबाधित राहण्यास मदत शहराचे सौंदर्य अबाधित राखणे आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अतिक्रमणामुळे शहर विद्रूप होत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्याने ही कारवाई अपरिहार्य ठरल्याचे सांगण्यात आले. मोहिमेत सातत्य ठेवण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## शासकीय कार्यालयात विना हेल्मेट प्रवेशाला बंदी -जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यामध्ये होणारी प्राणहानी रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज एका विशेष परिपत्रकाद्वारे जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांना दुचाकी चालवताना 'आय.एस.आय.' मार्क असलेले हेल्मेट परिधान करणे बंधनकारक केले आहे. तरी रस्ते सुरक्षेसाठी नागरिकांनी आणि शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

जालना मुख्यालयातील सर्व शासकीय कार्यालयांच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांना दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे आता अनिवार्य असेल. जिल्हाधिकारी कार्यालय परिसर तसेच सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये हेल्मेट परिधान केलेल्या व्यक्तींनाच (कर्मचारी व अभ्यागत) प्रवेश दिला जाईल. प्रत्येक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांमार्फत तपासणी केली जाईल. हेल्मेट नसलेल्या व्यक्तींना कार्यालय परिसरात वाहन लावण्यास सक्त मनाई असेल. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागामार्फत मोटर वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. कार्यालय प्रमुखांनी आपल्या कर्मचाऱ्यांना या नियमाची माहिती देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी - कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे. या आदेशाची अंमलबजावणी आजपासूनच लागू करण्यात आली आहे. प्रशासकीय शिस्त आणि रस्ते सुरक्षेसाठी मोटर वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १२९ नुसार, दुचाकी चालक आणि पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट वापरणे कायदेशीररीत्या अनिवार्य आहे. प्रशासकीय स्तरावर याचा आदर्श निर्माण व्हावा, या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश निर्गमित केले आहेत.

## अवैध गौणखनीज वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

### १० महिन्यात ४४ वाहनांवर कारवाई, वसमतच्या पथकाची कामगिरी

हिंगोली। प्रतिनिधी

वसमत तालुक्यातील अवैध गौणखनीज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर तहसीलदार शारदा दळवी यांच्या पथकाने धडक कारवाईची मोहिम हाती घेतली असून मागील १० महिन्यात ४४ वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यांच्यावर ६८ लाख रूपयांचा दंड लावण्यात आला आहे. या कारवाईमुळे वसमत तालुक्यात अवैध गौण खनीज वाहतूकीला आळा बसल्याचे चित्र आहे.

वसमत तालुक्यातील वाळू घाटांवरून मागील काही दिवसांत अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक केली जात असल्याचे चित्र होते. रात्रीच्या वेळी वाळू वाहतूक करणारी वाहने भरधाव वेगाने वाहने चालवित असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. या शिवाय त्यातून शासनाचा महसूल देखील बुडत होता. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार शारदा दळवी यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्या मार्गदर्शनाखाली पथके स्थापन केली. या पथकांमध्ये मंडळ अधिकारी, तलाठी यांचा समावेश आहे. या शिवाय स्थानिक पातळीवर कोतवाल व पोलिस पाटील यांच्याकडूनही माहिती घेण्यास सुरवात करण्यात आली. दरम्यान, वसमत तालुक्यातील वाळू घाटांवर तहसीलदार दळवी यांनी स्वतः भेटी देऊन पाहणी केली शिवाय पथकांच्या माध्यमातून दिवसा व रात्रीच्या वेळी वाहनांची तपासणीही सुरु करण्यात आली होती. या तपासणीमध्ये मागील १० महिन्यात अवैध गौणखनीज वाहतूक करणारे ४४ वाहने तपासण्यात आली. या वाहन चालकांकडे कुठल्याही प्रकारची परवानगी नसल्याने सदर वाहने जप्त करण्यात आली आहेत. यामध्ये अवैधरित्या वाळू वाहतूक करणारी २७ वाहने जप्त करून ३६.६१ लाख रुपये दंड लावण्यात आला आहे. मुरूम वाहतूक करणारी ११ वाहने जप्त करून २.४१ लाख रुपये, माती वाहतूक करणाऱ्या २ वाहनांवर कारवाई करून ४.५२ लाख रुपये तर दगड वाहतूक करणाऱ्या ४ वाहनांवर कारवाई करून १.०५ रुपयांचा दंड लावण्यात आला आहे. दरम्यान, तालुक्यात होणाऱ्या या कारवाईमुळे वाळूतस्करांचे धाबे दणाणले असून आता लगतच्या नांदेड जिल्हयातून वाळू आणली जात आहे. त्यामुळे आता या वाहनांवर कारवाईसाठी नांदेड मार्गावरून येणाऱ्या वाहनांची तपासणीही हाती घेण्यात आली असल्याचे सुत्रांनी सांगितले.

## पोलिसांनी मांडले जिजाऊ चौकात ठाण, वाहतुकीला शिस्त

### शहरातील चौकात वाहने उभी केल्यास होणार कारवाई

धाराशिव। प्रतिनिधी

धाराशिव राजमाता जिजाऊ चौकात रविवारी सायंकाळी रात्री ७.३० वाजता वाहतूक कोंडी झाली होती. सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे शहरवासीय त्रस्त आहेत. दि. १० फेब्रुवारीपासून बारावीची बोर्डाची परीक्षा सुरू झाली. त्याअनुषंगाने शहरातील महत्त्वपूर्ण चौकात वाहतूक पोलिसांची संख्या वाढवल्याने वाहतूक सुरळीत झाली. मंगळवारी जिजाऊ चौकात सकाळपासून दुपारपर्यंत तीन वाहतूक पोलिस थांबल्याने कोंडी झाली नाही. दुसरीकडे बार्शीवरून येणाऱ्या एसटी बसेस जिजाऊ चौकात न थांबवता चौकापासून किमान १०० मीटर मागे किंवा १०० मीटर पुढे बस थांबवाव्यात, अशा सूचना एसटी प्रशासनाला दिल्या. शहरातील प्रमुख रस्त्यांवर, प्रमुख चौकात उभ्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यास वाहनधारकांवर तत्काळ दंडात्मक कारवाई होणार आहे. सहायक पोलिस निरीक्षक अरविंद हिंगोले यांनी वाहतूक सुरळीत केली. धाराशिव शहर वाहतूक शाखेतर्फे जिजाऊ चौकात तीन वाहतूक पोलिसांसह दोन होमगार्ड मर सेंटीनर बिल्डिंग चौक, आठवडी बाजार परिसर, बसस्थानक परिसरात वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली आहे. यावर वाहतूक शाखेतर्फे शहरात लक्ष ठेवले जात असून, जिजाऊ चौकात वाहनधारकांना समज दिली जात आहे. नगरपरिषदेकडून अतिक्रमणाविरोधात कठोर पावले उचलली जात नाहीत. अतिक्रमणामुळे रस्तास अरुंद पडत असून, त्यातच काहीजण रस्त्याकडेला वाहन उभे करून खरेदीसाठी निघून जातात. मंगळवारी दुपारी दीड वाजता जिजाऊ चौकात वाहतूक पोलीस कर्तव्यावर असल्याने वाहनधारकांना समज देताना पत्रव्यवहाराला परिषदेसह बांधकाम विभागाकडून केराची टोपली धाराशिव शहरातील रस्त्यामुळे होणारा वाहतूक कोंडीचा त्रास सोडवण्यासाठी तसेच रस्त्यांनी मोकळा श्वास घ्यावा, यासाठी वाहतूक शाखेतर्फे धाराशिव नगर परिषद व बांधकाम विभागाकडून केराची टोपली दाखवली जात आहे. शहरातील वाहतूक कोंडीला प्रामुख्याने रस्त्याकडेचे अतिक्रमण कारणीभूत असून, यासाठी नगर परिषद प्रशासन, बांधकाम विभग व वाहतूक शाखेच्या कारवाईची गरज आहे. दिवाळीनंतर शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक अरविंद हिंगोले यांनी रस्त्याकडेच्या अतिक्रमणासाठी बांधकाम विभाग व धाराशिव नगरपरिषदेला दोन ते तीन वेळा पत्रव्यवहार केला आहे. परंतु नगरपालिकेने अद्याप याला उत्तर दिले नसल्याची माहिती आहे.

## श्रीगोंद्याच्या गायरान जमिनीतून अंधारात माती चोरीचा प्रकार

श्रीगोंदे। प्रतिनिधी

जिल्ह्यातील विविध भागात अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणात होतो. पण श्रीगोंदे तालुक्यात मात्र माती माफिया तयार झाले आहेत. शेडगाव येथील गट नंबर ६२२ मधील शासकीय गायरान जमिनीतून मोठ्या प्रमाणात माती चोरी केली जात असल्याचा प्रकार उघड झाला आहे. मध्यरात्री गुपचूप पद्धतीने जेसीबीच्या माध्यमातून खोदकाम करून माती हायवामध्ये भरली जाते आणि तालुक्यातील विविध भागात पोहोचवली जाते. तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वीटभट्ट्यांसाठी या मातीचा वापर केला जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

गायरान जमिनीवरील मातीची चोरी केली जात असल्याने संतप्त ग्रामस्थांनी संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांना याबाबत माहिती दिली होती. मात्र अद्याप कोणतीही चौकशी किंवा ठोस कारवाई झालेली नाही.त्यामुळे शेडगाव ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गायरान जमीन ही सार्वजनिक वापरासाठी राखीव असताना, या जमिनीतून जेसीबी व हायवा वाहनांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात माती उपसण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या प्रकारामुळे शासकीय मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असून पर्यावरणीय संतुलनही धोक्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या प्रकाराची तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई केली नाही तर शेडगाव ग्रामस्थांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला. शेडगाव येथील गट नंबर ६२२ मधील गायरान जमिनीवरील माती नेल्याने ठिकठिकाणी असे मोठे खड्डे निदर्शनास येतात. मध्यरात्री अशा पद्धतीने मशिनी लावून माती उकरली जाते आणि हायवामध्ये भरून त्याची विक्री करतात.

cmyk

# स्व. अजितदादांच्या स्वप्नातील जिल्हा घडविण्यासाठी कटिबध्द-पालकमंत्री पवार

## जिल्हा नियोजन समितीची भावूक वातावरणात सभा; सन २०२६- २०२७ चा आराखडा सभागृहात सादर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा पुणे, पिंपरी चिंचवड आणि बारामतीसारखा विकास करण्याचे स्वप्न उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांनी उराशी बाळगले होते. त्यांच्या या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी सर्व अधिका-यांनी व यंत्रणेने काम करावे असे भावनिक आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज जिल्हा नियोजन समितीच्या सभेत केले. या बैठकीत सन २०२६-२०२७ चा आराखडा सादर करण्यात आला व



चालू आर्थिक वर्षाच्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. चालू आर्थिक वर्षात ५७५ कोटींचा नियतव्यय प्राप्त असून यातील ५६५ कोटी ४१ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

आज दूरदृश्य संवाद प्रणालीव्दारे झालेल्या या बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, नमिता मुंदडा, यांची मुंबईतुन तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर आदींची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मुंबईत याबाबतचे सादरीकरण केले. जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यावेळी उपस्थित होते. बैठकीत प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा परिचय देणारी चित्रफित दाखवण्यात आली. माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी यावेळी शोकप्रस्ताव मांडला. याप्रसंगी सर्व लोकप्रतिनिधींनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. यानंतर सभागृहात दोन मिनिटे मौन पाळून स्व. अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

दुरदृश्य प्रणालीव्दारे जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची उपस्थिती होती. अत्यंत भावूक वातावरणात झालेल्या या सभेस बीड येथील सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेचे पान ३ वर

# इंग्लंड वगळता प्रमुख संघांची विजयी वाटचाल

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा आता रंगायला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेची सुरुवात तशी वादानेच झाली आयपीएलमधून मुस्तफिजूर रहमान याला काढल्यामुळे बांगलादेश संघाने म्हणण्यापेक्षा बांगलादेश सरकारने आम्ही या स्पर्धेत भाग घेणार नाही असे जाहीर केले आणि तावातवाने पाकिस्ताननेही सुरवातीला बांगलादेशला पाठिंबा म्हणून आम्हीही भारताबरोबर खेळणार नाही असे जाहीर केले. बांगलादेश संघ आपल्या निर्णयावर ठाम राहिला मात्र आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पाकिस्तानला असा काही दम भरला की ते आता. भारताबरोबरही खेळण्यास तयार झाले आहेत. या वादग्रस्त पार्श्वभूमीवर ही स्पर्धा सुरू झाली. सुरुवातीचे काही सामने तसे एकतर्फी ठरले तरी काही नवोदित संघांनी आपली चमक दाखवून दिली आहे .इंग्लंड विरुद्ध नेपाळच्या संघाने विजयश्री जवळपास खेचून आणली होती मात्र अनुभव कमी पडला आणि ऐनवेळी अनुभव कमी पडला परिणामी




हातातोंडाशी आलेला विजय नेपाळच्या घशातून निघून गेला .या सामन्याची चांगलीच चर्चा झाली काही नवोदित संघही खळबळजणक परिणाम नोंदवू शकतात याची चाहूल लागली आणि काल दक्षिण आफ्रिका संघ कसाबसा अफगाणिस्तान विरुद्ध जिंकू शकला, त्यातही त्यांना दोन सुपर ओव्हर खेळाव्या लागल्या आणि यातही अनुभवाच्या कमतरतेमुळेच अफगाणिस्तान संघाला दुर्दैवी हार पत्करावी लागली .प्रारंभीच्या अमेरिके विरुद्धच्या सामन्यात भारतालाही संघर्ष करावा लागला मात्र कर्णधार सूर्यकुमार यादवच्या अफलातून फलंदाजीमुळे आपली नामुष्की टळली,एक बरे झाले सुरवातीलाच भारतीय संघाचा कस लागला.काल इंग्लंडला वेस्ट इंडिज संघाने पराभूत करून क्रिकेट विश्वात आपण पुन्हा दबदबा निर्माण करू शकतो हे दाखवून दिले आहे. पाकिस्तानने अमेरिका संघाला पराभूत केले.तर आज इंग्लंडला झुंजवणारा नेपाळ संघ नवोदित इटली संघाकडून सहज पराभूत झाला आणि श्रीलंकेने ओमान संघाला एकतर्फी हरवले.

## असं का होतं?

क्रिकेटमध्ये अलीकडे आलेल्या देशांचे संघही दर्जेदार क्रिकेट खेळत आहे याचा प्रत्यय कालपासून सुरू झालेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येत आहे.काल पाकिस्तान संघ नेदरलंड बरोबर कसाबसा जिंकला ते अमेरिका संघाने भारतीय संघाला जेरीस आणले होते.आजही इंग्लंड विरुद्ध नेपाळला जिंकायला फक्त ५ रन कमी पडले.क्रिकेट खरेतर अनिश्चिततेचा खेळ आहे पण या तीन सामन्यात मग प्रस्थापित संघच कसे जिंकले? स्किल सर्वत्र असते वाणवा असते ती अनुभवाची अन हरलेल्या तिन्ही संघात अनुभव नव्हता हेच खरे नाहीतर एक नव्हे तर तीन उलटफेर या विश्वचषक स्पर्धेत पहायला मिळाले असते. अजूनही काहीतरी अकल्पित घडेल असे वाटते,घडावेही....



**व्युवर्स व्युव..**
**महेश वाघमारे.**

# शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून एसटी बसेसला दिल्या नवीन डिजिटल पाट्या

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर पत्रकार संघ व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारातील एसटी महामंडळाच्या अनेक एसटी बसेस वर लावण्यात येणाऱ्या गावाच्या नावांच्या पाट्या जीर्ण झाल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांनी नवीन डिजिटल गावाच्या नावांच्या पाट्या तयार करून एसटी प्रशासनाला भेट दिल्या. शिवप्रसाद सिरसाठ यांनी हाती घेतलेल्या या नवीन उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक




आणि अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की बीड आगारातून बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर, बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर- रांजणगाव, बीड-ईट-आडगाव आदी ग्रामीण भागात धावणाऱ्या अनेक एसटी बसेसना स्पष्ट बोर्ड नसल्याने प्रवाशांना वारंवार एसटी बस चालक व वाहकांना विचारणा करावी लागत आहे. यामुळे एसटी बस चालक-वाहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अनेकदा बोर्ड नसल्यामुळे किंवा न दिल्याने बस जवळून गेली तरी प्रवाशांना ती ओळखता येत नव्हती. ही बाब पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष पान ३ वर

# तेजस अर्बनकडून शेतकऱ्यांसाठी दिलासादायक धान्य तारण योजना सुरू

## १६ टक्के व्याजदरात कर्ज; अध्यक्ष ॲड.प्रकाश दादा कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली नवी योजना



बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, बीड या संस्थेच्या वतीने धान्य तारण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना व सभासदांना त्यांच्या धान्यावर तारण ठेवून १६ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ही संस्था २०१६ पासून सातत्याने कार्यरत असून, अल्पावधीतच संस्थेने सभासदांच्या विश्वासावर भक्कम उभारणी केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक आधार देण्यासाठी संस्था विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड प्रकाश दादा कवठेकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली ही धान्य तारण योजना सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना धान्य विक्रीसाठी योग्य बाजारभाव मिळेपर्यंत तात्पुरत्या आर्थिक गरजा भागवता याव्यात, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सावकारांवर पान ३ वर

# कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द करा - शिवाजी कुरे

माजलगाव । प्रतिनिधी

सिटू संघटनेच्या वतीने देशव्यापी संप पुकारण्यात आलेला होता.त्या संपात देशातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना सहभागी झालेल्या होत्या. त्या संपाचाच भाग म्हणून दि १२ फेब्रुवारी गुरुवार रोजी माजलगाव तहसीलवर सिटू संघटनेच्या वतीने संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला.

केंद्र सरकारने प्रचलित २९ कामगार कायद्याचे रूपांतर चार श्रमसंहिता कायद्यात केलेली आहे.नवीन श्रम संहिता ह्या संपूर्णपणे उद्योग धारजीने आणि भांडवलदाराच्या बाजूच्या असून




कामगार विरोधी आहेत जुन्या कायद्यानुसार कामगारांना जे संरक्षण प्राप्त झालेले होते ते संपूर्ण नवीन कायद्यामधून नष्ट झालेली आहे त्यामुळे भारत देशातील संघटित क्षेत्रातील व असंघटित क्षेत्रातील संपूर्ण कामगार असुरक्षित झाला आहे त्याला विरोध करण्यासाठीच संघटनेने देशव्यापी आंदोलन पुकारले आहे.यावेळी दिलेल्या निवेदनात संघटनेने म्हटले आहे की,कामगार विरोधी चारश्रम संहिता रद्द करा, सर्व योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतन प्रदान करा,मनरेगा कायदा पूर्ववतपणे चालू ठेवा,आशांनी ऑफलाइन काढलेल्या आयुष्यमान कार्डाचे तात्काळ पैसे देण्यात यावे, आशांना दरमहावेतन चिठ्ठी देण्यात यावी, ग्रामरोजगार सेवकांचे थकीत मानधन तात्काळ वाटप करा,शालेय पोषण कामगारांना दहा महिन्याच्या ऐवजी संपूर्ण बारा महिन्याचे मानधन देण्यात यावे, निराधार वृद्धांचे पेन्शन दरमहा वेळेवर वाटप करण्यात यावे.या मोर्चात दत्ता डाके,शिवाजी कुरे, सय्यद रज्जाक,रामचंद्र चिंचाणे,रत्नाकर गोळेकर,उषा औसे,उर्मिला शेंडगे,अर्चना पांचाळ,बंडूराम गरड,मुसद्दीक बाबा,अशोक पोकळे,विनायक पौळ,मोहन जाधव, सुहास झोडगे, आसाराम राठोड, उपस्थित होते.

# भागवत कथा श्रवणात जीवनाचे सार्थक



अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रीमद् भागवत कथा ही संपुर्ण जगाची कल्याणकारी कथा आहे. तिच्या श्रवणातून मनुष्याच्या जीवनाचे सार्थक होते.असे प्रतिपादन भालचंद्र महाराज केजकर देव यांनी येथील निवृत्त तहसिलदार सुभाष देशपांडे, प्राचार्य डॉ. रमण देशपांडे यांच्या चौसाळकर वसाहती मधील आपूलकी निवासस्थानी आयोजित भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा समारोपप्रसंगी केले.

भागवत ग्रंथामधील श्रीकृष्ण लीलांचे तसेच पान ३ वर

# प्रलंबित प्रश्नांसाठी बांधकाम कामगारांचा मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या मागण्यांसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांनी विराट मोर्चा काढला. या मोर्चामध्ये कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्यानंतर संघटनेच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारने २९ कायदे मोडीत काढून नवीन चार श्रम संहिता तयार केल्या आहेत व त्यांची २१ नोव्हेंबर २०२५ रोजी अध्यादेश काढून अंमलबजावणी सुरू केली आहे. एकही कामगार कायम नोकरीत राहणार नाही, सर्व नोकऱ्याचे कंत्राटीकरण होणार आहे, कामगार कायदे संपुष्टात आले आहेत, यामुळे संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगाराना मालकाच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागणार आहे. ही मोदी आणि भाजप सरकारने देशातील मालकांना दिलेली मोठी गिफ्ट आहे, ज्यामध्ये यापुढे मालक कामगारांची प्रचंड पिळवणूक करणार आहे, म्हणून देशातील प्रमुख १० संघटनानी हा देशव्यापी एक दिवसाचा संप घोषित केला आहे. याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील हा मोर्चा काढण्यात आल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

कामगार विरोधी ४ श्रम संहिता मागे घ्या, रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा लागू करा, सर्व क्षेत्रातील असंघटित कामगारांना किमान वेतन ३० हजार रुपये करा. नवीन वी वी रामजी कायदा रद्द करा, मनरेगा कायदा पुन्हा लागू करून वार्षिक २०० दिवस काम आणि दररोज मजुरी किमान ८०० रुपये द्या. कंत्राटी कामगारांना कायम करा, कंत्राटी कामगार कायदा रद्द करा. योजना कर्मचाऱ्यांना कायम करा आदी मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. निवेदनावर संघटनेचे जिल्हा सरचिटणीस कॉ. ओम पुरी यांच्यासह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# वळण रस्त्यावर ट्रॅक्टर पलटी होऊन २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

शेतातील वळण रस्त्यावर ट्रॅक्टर पलटी होऊन त्याखाली तो दबल्यामुळे तरुणाचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना हिवरा बुद्रुक गावात दि १२ फेब्रुवारी गुरुवार रोजी पहाटेच्या सुमारास घडली. गणेश भारत गाडे वय २८ वर्ष असं मृत तरुणाचं नाव आहे.



यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार मयत गणेश गाडे हा दि १२ फेब्रुवारी गुरवार रोजी पहाटे २:०० वाजता शेतातील कामासाठी ट्रॅक्टर घेऊन जात होता.यावेळी शेत वळण रस्त्यावर ट्रॅक्टरला टर्न मारत असताना ट्रॅक्टर पलटी झाला.या झालेल्या अपघातात ट्रॅक्टर अंगावर पडल्याने गणेश गाडे हा गंभीर जखमी झाला. अपघात झाल्यानंतर स्थानिक लोकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली जखमी तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत तरुण शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता.या घटनेमुळे तरुणाच्या गावात शोककळा पसरली आहे. या घटनेची नोंद माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात घडली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# अविनाश मुडेगांवकर यांना सुवर्णरत्न पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संकल्प विद्या प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने दिला जाणारा सुवर्ण रत्न पत्रकारिता पुरस्कार अंबाजोगाई येथील दै.लोकमत चे तालुका प्रतिनिधी अविनाश मुडेगांवकर यांना जाहीर झाला आहे.मान्यवरांच्या उपस्थितीत हा सुवर्णरत्न पुरस्कार वितरण सोहळा शनिवार २८ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रेखा बडे,सचिव कैलास चोले,पुरस्कार समिती सदस्य दगडू लोमटे यांनी सांगितले.



अविनाश मुडेगांवकर हे बऱ्याच वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. लहान मोठया पुरस्कारासह त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. स्वांतत्र्यपूर्व काळात मराठी शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या व महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर राहून दबदबा निर्माण करणाऱ्या व शताब्दी परंपरा असणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी अविनाश मुडेगांवकर यांनी लेखणीच्या माध्यमातून त्यांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले असून त्यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बीड कृषी विभागाच्या ई-निविदा प्रक्रियेत शासनाच्या नियमांना तिलांजली

**आष्टी । प्रतिनिधी**

उपविभागीय कृषी कार्यालय, बीड यांच्यामार्फत नुकत्याच काढण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेत शासन निर्णयाचे सरळ-सरळ उल्लंघन झाल्याचा खळबळजनक आरोप महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ते जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार आहेत.

उपविभागीय कृषी कार्यालयाने ९ जानेवारी २०२६ रोजी खोल समतल चर आणि कंपार्टमेंट बंडिंगच्या कामांसाठी ई-निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. यामध्ये आष्टी तालुक्यातील कासेवाडी, बुरुडवाडी, वनवेवाडी आणि शिरूर तालुक्यातील खरगवाडी, नागरेवाडी या गावांचा समावेश होता. या निविदा भरण्यासाठी २६ जानेवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. शासनाच्या २८ फेब्रुवारी २०२४ च्या निर्णयानुसार, कोणत्याही निविदा प्रक्रियेत कामांची विभागणी करण्याचे स्पष्ट सांगण्यात आलेले आहे. असे असताना उपविभागीय कृषी अधिकारी यांनी मात्र या जीआर ला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत आहेत. शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्था: ३३%, सुशिक्षित बेरोजगार अभियंता: ३३%, खुला प्रवर्ग: ३४% अशाप्रकारे कामाचे वाटप होणे आवश्यक होते. परंतु, आष्टी विधानसभा मतदारसंघातील कामांचे वाटप करताना या टक्केवारीचे पालन करण्यात आलेले नाही. उपलब्ध माहितीनुसार, या ठिकाणी मजूर सहकारी संस्थांसाठी ५ कामे, बेरोजगार अभियंत्यांसाठी २ कामे आणि खुल्या वर्गासाठी १ काम दर्शविण्यात आले आहे. ही विभागणी शासन निर्णयाच्या निकषात बसत नसल्याचे दरेकर यांनी निदर्शनास आणून दिले आहे. मजूर सहकारी संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कामाच्या सवलती मिळाव्यात यासाठी शासनाने स्पष्ट नियम केले असतानाही, कृषी विभागाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे.

**मजूर संस्था व बेरोजगार अभियंत्यांच्या आरक्षणाकडे दुर्लक्ष; जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी करणार - कैलास दरेकर**

''कृषी विभागाने निविदा प्रक्रिया राबवताना मजूर संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या हक्कावर गदा आणली आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता मनमानी पद्धतीने ही प्रक्रिया राबवली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल.''

**- कैलास दरेकर, जिल्हाध्यक्ष, मनसे शेतकरी सेना**

# स्व.अजितदादांचे बीड शहरात भव्य स्मारक उभारणीसाठी मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदिल

## राज्यस्तरीय नियोजन बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियोजन बैठक संपन्न झाली. बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून दृकश्राव्य प्रणालीद्वारे आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत



सहभागी होत बीड नगर परिषद हद्दीत दिवंगत स्व.अजितदादा पवार यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय सकारात्मक पध्दतीने त्यास मान्यता देऊन हिरवा कंदिल दाखविला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनांचा प्रारुप आराखडा अंतिम करण्यासाठी राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित बीड जिल्हाधिकारी कार्यालयातून या बैठकीत सहभागी झाले. स्व.अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्विकारल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यात अनेक विकास कामांची सुरुवात केली. अनेक विकास योजना सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पालकमंत्री म्हणून स्व.अजितदादांच्या पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# खासदार बजरंग सोनवणेंच्या शंकेला वाव, विमान कोसळण्याआधीच स्फोट झाला, नागरिकांच्या दाव्यावर नेमकं काय म्हणाले मिटकरी ?

**पुणे । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघात झालेल्या विमानाचा कोसळण्याआधीच स्फोट झाल्याचा दावा विमानतळा नजीकच्या गोजुबावीच्या काही नागरिकांनी केला होता. या नागरिकांचा हा दावा खासदार बजरंग सोनवणे यांच्या आरोपाला पुष्टी देणारा असल्याचे मत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केलं आहे. खासदार बजरंग सोनावणे यांनी अजित पवारांच्या विमानात स्फोटक होती का? अशी शंका उपस्थित केली होती. यावर मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



या संपूर्ण विमान अपघाताची चौकशी उच्चस्तरीय बाह्य यंत्रणांकडून करण्याची मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या सीआयडी चौकशीला काही मर्यादा येत असल्याच ते म्हणाले. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार लवकरच राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांशी संवाद साधणार आहेत. यावर बोलताना आमदार अमोल मिटकरी यांनी सुनेत्रावहिनी या आईच्या भूमिकेतून प्रत्येक कार्यकर्त्याशी बोलत असल्याचे ते म्हणाले. दादांच्या जाण्याने पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी, आमदार, खासदार सैरभैर झाल्याचे ते म्हणाले. अशाने परिस्थितीत कुटुंबप्रमुख म्हणून सुनेत्रा वहिनींचा संवाद हा प्रत्येक कार्यकर्त्याला बळ देणार असल्याचच ते म्हणाले. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला विमान अपघातात मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की घात? असा प्रश्न उपस्थित के जात आहे. अजित पवार यांच्या विमा अपघाताबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक शंका उपस्थित केल्या आहेत. विमान टेक ऑफ पूर्वी चेकअप झालं होतं का? असा प्रश्न उपस्थित करत, रोहित पवारांनी विमानाचा टेकलॉग कुठे आहे आणि विमानाचा एअरवर्दी रिपोर्ट कुठे आहे? असे प्रश्न विचारले होते. टेकलॉगमध्ये मेंटनन्ससंबंधी माहिती असते तर एअरवर्दी रिपोर्टमध्ये विमान हवेत उडण्यास योग्य आहे की नाही, याचा तपशील असतो. याबरोबरच, टेक-ऑफपूर्वी विमान चेक करणारे कर्मचारी कोण होते? याची माहिती आणि त्यांची चौकशीही गरजेची असल्याचं रोहित पवार म्हणाले. रोहित पवारांनी याबाबत अत्यंत गंभीर शंका उपस्थित केली. हे सगळे खोटे रिपोर्ट तयार केले जाऊ शकतात, त्यामुळं या सगळ्याचे सीसीटीव्ही फुटेजही पाहावे लागतील,असं रोहित पवार म्हणाले. पायलटला उड्डाणानंतर ठराविक वेळेचा गॅप किंवा विश्रांती द्यावी लागते, पण याबाबत कंपनी नियमांचं उल्लंघन आणि कागदपत्रांवर वैमानिकांच्या उड्डाणाच्या तासांमध्ये फेरफार करत असल्याचं रोहित पवार म्हणाले. विमानातील सर्वात महत्त्वाचं कॉकपिट व्हाईस रेकॉर्डर वारंवार बंद ठेवलं जातं, तसंच विमान आणि दरम्यान पाळली जाणारी चेकलिस्ट वापरण्याची पद्धत नसल्याचंही त्यांनी सांगितलं. तसंच, विमानांच्या देखभालीकडं कंपनीकडून दुर्लक्ष केलं जातं, असा आरोपही त्यांनी केला.

# मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घ्यावा, अजितदादांच्या विमान अपघाताच्या चौकशीची माहिती जनतेला द्यावी, सुरज चव्हाण यांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला विमान अपघातात मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की घात? असा प्रश्न उपस्थित के जात आहे. अजित पवार यांच्या विमा अपघाताबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत अनेक शंका उपस्थित केल्या आहेत. यानंतर अजित पवार यांचे निकटवर्तीय असणारे सुरज चव्हाण यांनी देखील चौकशीच्या संदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. अजितदादांच्या अपघाताबद्दलची चौकशी



नेमकी कुठपर्यंत आली याची माहिती महाराष्ट्राच्या जनतेला भेटली पाहिजे. राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन चौकशीची माहिती महाराष्ट्राच्या जनतेला द्यावी, अशी मागणी सुरज चव्हाण यांनी केली आहे.

अजितदादांच्या अपघाताबद्दलची चौकशी नेमकी कुठपर्यंत आली याची माहिती महाराष्ट्राच्या जनतेला भेटली पाहिजे. राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन चौकशीची माहिती महाराष्ट्राच्या जनतेला द्यावी, असी मागणी सुरज चव्हाण यांनी केली आहे. राज्य सरकार कडून केंद्र सरकारला विनंती करावी या प्रकरणात आंतरराष्ट्रीय तपास यंत्रणेकडून याचा तपास करावा. अपघाताच सत्य महाराष्ट्राच्या जनतेसमोर सत्य आलं पाहिजे ही विनंती असल्याचे सुरज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

# कला, कर्तृत्व आणि गुणवत्तेचा संगम म्हणजे खरा शिक्षणोत्सव-कृष्णकुमार गोयल

**पुणे । प्रतिनिधी**

खडकी शिक्षण संस्थेचे टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक तसेच विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल होते.



अध्यक्षीय भाषणात गोयल म्हणाले, पारितोषिक वितरण हा केवळ पुरस्कारांचा कार्यक्रम नसून तो संस्थेच्या गुणवत्तेचा उत्सव आहे. कला, कर्तृत्व आणि गुणवत्ता यांचा संगम जिथे घडतो, तिथेच शिक्षणाचा खरा जल्लोष अनुभवायला मिळतो. त्यांनी विद्यार्थ्यांनी सातत्य, शिस्त आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा स्वीकार करावा, असे आवाहन केले. संस्थेचे ध्येय केवळ पदवी प्रदान करणे नसून जबाबदार व संवेदनशील नागरिक घडविणे आहे, असेही त्यांनी नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी प्रस्ताविक करत महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. टी. जे. महाविद्यालयाने शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपली ठळक छाप निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे संस्कार असतात, असे ते म्हणाले. महाविद्यालयात विविध विभागांच्या माध्यमातून अनेक उपक्रम, कार्यशाळा आणि कौशल्यविकास कार्यक्रम राबविले जात असल्याची माहिती त्यांनी वार्षिक वितरण समारंभासाठी प्रमुख वक्ते प्रदीप निफाडकर यांनी आपल्या प्रभावी शैलीत गझल सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. गुण हे केवळ गुणपत्रिकेतील आकडे नसतात; ते व्यक्तिमत्त्वाच्या घडणीतले प्रकाशकण असतात, असे सांगत त्यांनी शिक्षणातील संवेदनशीलता आणि जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कला आणि साहित्याचा सहवास व्यक्तिमत्त्व समृद्ध करतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी संस्थेचे सचिव आनंद छाजेड, पतसंस्थेचे पदाधिकारी रमेश अवस्ते, ड. अजित सूर्यवंशी तसेच ज्ञानेश्वर मुरकुटे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास उपप्रचार्य प्रा. महादेव रोकडे, डॉ. सुचेता दळवी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विध्यार्थी उपस्थित होते. समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.प्राध्यापकांना पुस्तक, संशोधन लेखन व इतर गुणवत्तापुर्ण कार्य केल्याबद्दल त्यांचाही सन्मान सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.स्वामीराज भिसे आणि डॉ. शीतल रणधीर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयक्यूएसी समन्वयक प्रा. गौरी माटेकर यांनी मानले.विद्यार्थ्यांच्या यशाचा उत्सव साजरा करताना कला, कर्तृत्व आणि गुणवत्तेचा संगम अनुभवायला मिळाल्याने हा सोहळा अतिशय संस्मरणीय ठरला, ही भावना विद्यार्थ्यांनी शिक्षकांमध्ये दिसून आली.

# अनधिकृत होर्डिंगविरोधात पुन्हा कारवाई; तपासणीसाठी पाच पथकाची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने पाच विशेष पथकांची नियुक्ती केली असून, या पथकांमार्फत शहरभर तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. परवानगीशिवाय लावलेले होर्डिंग, नियमांचे उल्लंघन करणारे, तसेच दिलेल्या आकारमानापेक्षा मोठ्या मापाचे फलक यांच्यावर कारवाई करून ते निष्कासीत केले जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी दिली.




या पथकांकडून तपासणीदरम्यान होर्डिंगच्या ठिकाणी परवानगीचा बोर्ड लावलेला आहे किंवा नाही, मंजूर परवानगीप्रमाणेच माप ठेवले आहे का, तसेच इतर जाहिरात नियमांचे पालन झाले आहे का, याची सखोल पाहणी केली जाईल. तपासणीत अनधिकृत होर्डिंग आढळून ते तात्काळ निष्कासित करण्यात येणार असून, त्यानंतर पुढील आर्थिक कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय संबंधित होर्डिंग कोणत्या वर्षापासून अस्तित्वात होते, याचा तपास गुगल इमेजच्या आधारे करण्यात येणार आहे.

त्याप्रमाणे संबंधित होर्डिंगधारकांकडून दंडासह परवाना शुल्क वसूल केले जाणार आहे, तसेच होर्डिंग निष्कासनासाठी येणारा सुमारे दोन लाख रुपये इतका खर्चही संबंधितांकडूनच वसूल करण्यात येणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. या मोहिमेअंतर्गत आज हडपसर भागात एका पथकाने तपासणी केली. त्यामध्ये एकूण ३० होर्डिंगची पाहणी केली. त्यापैकी सात होर्डिंग अनधिकृत आढळले. ते काढून टाकण्यात आले. शहरातील वाहतूक सुरक्षितता, नागरिकांची सुरक्षितता, तसेच सौंदर्यदृष्टी राखण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असून, पुढील काळात शहरातील इतर भागांतही अशीच कठोर तपासणी आणि कारवाई सुरू राहणार असल्याचे महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने स्पष्ट केले.

# दोरखंडात अडकून दुचाकीस्वाराचा अपघात; महापौर मंजूषा नागपूरे यांनी घेतली जखमीची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

कर्वेनगर येथील मेघराज सोसायटीसमोर झाडांच्या वाढलेल्या फांद्या कापण्यासाठी लावलेल्या जाड दोरखंडात अडकून दुचाकीस्वारांचा अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या रामेश्वर अवतीकर या तरुणाची महापौर मंजूषा दीपक नागपूरे यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात भेट घेतली. या वेळी त्यांनी रुग्णाच्या प्रकृतीची माहिती घेतली तसेच उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी चर्चा करून पुढील उपचाराबाबत सविस्तर जाणून घेतले.



कर्वेनगर परिसरातील एका सोसायटीत झाडांच्या वाढलेल्या फांद्या तोडण्याचे काम सुरू होते. यासाठी रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांच्या लक्षात येईल, अशी पुरेशी सुरक्षा व्यवस्था न करता जाड दोरखंड लावण्यात आला होता. बुधवारी दुपारी दुचाकीवरून येणाऱ्या दोन जणांचा या दोरखंडात अडकून अपघात झाला. या अपघातात दुचाकी चालविणाऱ्या रामेश्वर अवतीकर यांचा गळा गंभीररीत्या चिरला गेला, तर मणक्यालाही मार बसला. त्यांना तातडीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टरांनी महापौरांना रुग्णाची सध्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची माहिती दिली. आवश्यक त्या शस्त्रक्रिया आणि पुढील उपचारांची तयारी करण्यात आली असून, तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक त्याच्यावर लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महापौर नागपूरे यांनी रुग्णाच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. तसेच, उपचारासाठी आवश्यक ती सर्व मदत विविध माध्यमातून उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी झाडे तोडताना व रस्त्यावर काम करताना योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

# डिलिव्हरी बॉयचा अपघातात मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

ऑनलाइन शॉपींग साईच्या माध्यमातून घरगुती सामान घरी पोहचविण्यासाठी जात असलेल्या डिलिव्हरी बॉयला मद्यधुंद चालकाकडील भरधाव वेगातील कारने दिलेल्या धडकेत त्याचा मृत्यू झाला. हा प्रकार वडगाव बुद्रुक येथील सिंहगड कॉलेज रोड येथील क्रिकेटच्या मैदानाजवळ घडला. धडक देणारी कार त्याला मदत न करताच निघून गेल्याने डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला.

राहुल दिनकर पवार (वय ३०, रा. मु. पो. पाटण, ता. सिंदखेडा, जि. धुळे) असे अपघाती मृत्यू झालेल्याचे नाव आहे. तर याप्रकरणी सोजल शामराव औटी (वय २२, रा. शेलपिंपळगाव, आळंदी), अभिषेक संजय शिंदे (वय २१, रा. कोळणे फाटा, आळंदी) आणि विघ्नहर्ता शामराव औटी (वय २७, रा. शेलपिंपळगाव, आळंदी, पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. हा अपघात १० फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडला. याबाबत राहुलचा मित्र कैलास विक्रम डोईफोडे (वय ४६, रा. धायरी रोड, गोकुळनगर) याने फिर्याद दिली आहे. याबाबत तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक माधुरी काजळे यांनी सांगितले, कारमधील तीन आरोपींना अटक केली आहे. मद्यधुंद अवस्थेत आरोपी कार चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तर राहुल हा मुळचा धुळे येथील रहिवासी असून मागील दोन वर्षांपासून कामासाठी तो पुण्यात आला होता. डिलिव्हरी बॉयचे काम करून तो स्वतःची उपजिविका भागवत घरी पैसे पाठवत होता. राहुलच्या गावाकडे याबाबत माहिती दिली असून त्याचे घरचे पुण्यात येत आहेत.

# अडीच हजार दुचाकीस्वारांनी भरला २९ लाखांचा दंड

**पुणे । प्रतिनिधी**

बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मंगळवारी (दि.१०) कारवाईचा बडगा उगारला. विरुद्ध दिशेने जाणारे, ट्रिपल सीट असे नियमभंग करणाऱ्या अडीच हजार दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई केली. वाहतूक शाखेसह स्थानिक पोलीस ठाण्यातील पथके या कारवाईत सहभागी झाली होती. रात्री उशिरापर्यंत ही कारवाई सुरू होती. दिवसभरात अडीच हजार दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई केली असून,

त्यांच्याकडून २९ लाख ३८ हजार ४५० रुपये दंड वसूल केल्याची अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली.पोलिसांनी वेगवेगळ्या भागात कारवाई करुन दुचाकी जप्त केल्या. दुचाकीच्या कागदपत्रांची पूर्तता, तसेच थकीत दंड वसूल केल्यानंतर दुचाकी ताब्यात देण्यात आल्या. कारवाईमुळे दुचाकीस्वारांना नियमभंगाच्या परिणामांची जाणीव झाली. कर्णकर्कश हॉर्न, सायलेन्सरमध्ये फेरफार करुन विक्री करणाऱ्या वारजे भागातील दुकानदारांविरुद्ध कारवाई केल्याचे पाटील यांनी नमूद केले. भरधाव दुचाकी चालविणे, एकाच दुचाकीवरुन तिघांचा प्रवास (ट्रिपल सीट), विरुद्ध दिशेने जाणे



(रॉंग साईड) अशा प्रकारचे नियमभंग करण्याचे प्रकार वाढले आहे. बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे गंभीर अपघात घडतात. भरधाव दुचाकीस्वार पादचाऱ्यांना धडक देऊन पसार झाल्याच्या घटना घडल्या आहे. दुचाकीस्वार स्वतःचा जीव धोक्यात घालतात, तसेच समोरुन येणाऱ्या वाहनचालकांना हूल देतात. त्यामुळे गंभीर अपघात घडतात. बेशिस्त वाहन चालकांचे बुधवारी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात समुपदेशन करण्यात आले. समुपदेशनाच्या माध्यमातून वाहतूक पोलिसांनी दुचाकीस्वारांना शिस्तीचे धडे दिले. समुपदेशन कार्यक्रमात ४५० ते ५०० दुचाकीस्वार सहभागी झाले होते. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांच्यासह वाहतूक शाखेतील अधिकारी या वेळी उपस्थित होते.

# टाकळी हाजीतील शिनगरवाडीत अल्पवयीनांकडून चोरी व तोडफोड

**टाकळी हाजी । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील शिनगरवाडीत अल्पवयीन मुलांकडून सातत्याने चोरी व तोडफोडीचे प्रकार घडत असल्याचे उघडकीस आले. या प्रकारांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिनगरवाडी येथील प्राथमिक शाळेमध्ये कॅमेरे फोडणे, शैक्षणिक साहित्याचे नुकसान करणे, बोअरवेलची केबल तोडणे, वर्गखोलीत जाणूनबुजून लघुशंका, अस्वच्छता करणे असे प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हे सर्व प्रकार घडण्यामागे नक्की काय कारण असावे याबाबत नागरिकांमध्ये उलट-सुलट चर्चा झडत आहेत. यासोबतच येथील किराणा दुकानात चोरीचे प्रकारही घडले आहेत. टाकळी हाजी ग्रामपंचायतीने शिनगरवाडीसाठी बसविलेल्या आर. ओ. फिल्टरच्या शटरचे लॉक तीनवेळा तोडून कटावणीच्या साहाय्याने उचकून कॉइन बॉक्समधील रक्कम चोरून नेण्यात आली. विशेष म्हणजे कॉइन बॉक्ससाठी बनावट चावी तयार करण्यात आल्याचेही ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. दरम्यान, येथील ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी चोरी करताना ४ अल्पवयीन मुलांना रंगेहाथ पकडले. यानंतर ग्रामविकास अधिकारी राजेंद्र खराडे यांनी टाकळी हाजी पोलिस दूरक्षेत्र येथे तक्रार दाखल केली आहे. यापूर्वीही परिसरात घरफोडी, शेतातील साहित्यचोरी, कृषिपंप चोरी, केबलचोरी, विद्युत रोहित्रांचे नुकसान अशा अनेक घटना घडल्या आहेत. तसेच बाहेरून आलेल्या मजुरांच्या साहित्यामधून पैशांची चोरी झाल्याचे प्रकारही उघडकीस आले आहेत. या सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे या मागे कोणीतरी मोठी टोळी कार्यरत असल्याची शंका ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात असून, शिरूर पोलिसांकडून सखोल तपास व्हावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

# एक फोन अन् ६ कोटी ७० लाखांचा गंडा !

**पुणे । प्रतिनिधी**

दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये, या वाक्यप्रचाराच्या धर्तीवर फसणारे आहेत, चलाख फसवणारे पाहिजेत, असे म्हणता येईल. एखाद्याला किरकोळ कारणाखाली कल्पकतेने कसे फसवता येते याचे एक उत्तम उदाहरण उघड झाले आहे. ड्रेनेज लाईन दुरुस्तीच्या बहाण्याने एका चलाख गुन्हेगाराने नारायण पेठेतील एका ज्येष्ठाची थोडी थोडकी नव्हे तर तब्बल ६ कोटी ७० लाख ३७ हजार ५०० रुपयांची फसवणूक केली आहे.



विश्रामबाग पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हेगाराने संदिप चव्हाण, आदित्य चव्हाण, जितेन सोळंकी, शर्मा, महाजन, राउत नावांचा आणि बँक मॅनेजर, जज, पोलीस अधिकारी रुपांचा वापर करत वेळोवेळी वरील रक्कम आपल्या खात्यात जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी सिरम इन्स्टिट्यूटमधील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी असून गुन्हेगाराने वर्षभर त्यांना मानसिक दबावाखाली ठेवले. फिर्यादीच्या आईच्या नावावर नवी पेठेत घर असून तेथे भाडेकरू राहतात.

२८ एप्रिल २०२४ रोजी भाडेकरूने फोनवर एकजण ड्रेनेज तपासणीस आल्याची माहिती दिली. फिर्यादी जेव्हा त्यांच्याशी फोनवर बोलले तेव्हा त्याने आपले नाव संदिप चव्हाण असे सांगितले. सोसायटीची तक्रार असून त्यानुसार ड्रेनेजची तपासणीसाठी आलो असल्याचे त्याने सांगितले. ड्रेनेजमध्ये झाडांची मुळे गेल्यामुळे मेन ड्रेनेज लाईनपर्यत स्वतंत्र लाईन टाकावी लागेल असे सांगितले. त्याने महापालिकेचा अधिकारी असल्याची बतावणी केली. या कामासाठी ६५ हजार आणि साहित्य व मशिनरीसाठी वेगळा खर्च होईल असे सांगितले. कधी साहित्य, मशीन डिपॉझीट, एमएसईबी केबल शिफ्टींग, विविध विभागाचे चलन आदी कारणांसाठी त्याने १५ लाख, ,९ लाख ९९ हजार, ८ लाख ७६ हजार असे पैसे घेतले. मशीन डिपॉझीट आणि चलनासाठीचे काही पैसे परत मिळतील असे सांगितले होते. यानंतर फिर्यादींना पोलीस उपनिरीक्षक बोलत असल्याचा फोन आला. त्याने संदिपने घोळ घातला असून त्याला ठाम्यात आणल्याचे सांगितले. त्याचा वकील, त्याचा भाऊ आदित्य चव्हाणशी बोलण्यास सांगितले. आदित्यने आता संदिप बोलणार नाही मीच बोलेने आणि तुमचे डिपॉझीटचे पैसे मिळवून देतो, असे सांगितले. त्यानंतर आदित्य, अनिल चव्हाण, सोलंकी, शर्मा, कदम, राउत असे वेगवेगळया नावांनी फिर्यादीशी बोलत होते. वेगवेगळ्या कारणांनी भिती घालून पैसे घ्यायचे. एकदा न्यायाधीश बोलतोय असा फोन करून पुन्हा पैसे घेतले.

मनी ट्रान्सफर, सर्व्हिस चार्ज, बँक खात्यामध्ये बॅलन्स मेन्टेन करणे, तसेच संदिपच्या मुलाचे ऑपरेशन, नंतर वेगवेगळ्या नावाने नातेवाईक वारल्याचे कारणे सांगत ब्लॅकमेल करुन पैसे घेतले. फिर्यादीकडून जून २०२५ पर्यंत ६ कोटी १६ लाख १३ हजार ३००६ कोटी ७० लाख ३७ हजार उकळले. याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दादासाहेब पाटील करत आहेत.

cmyk